# डॉ. नितीन मोरे



# मुघले ते शोले

## Version 2.0.2.0

# मुघले ते शोले

version2.0.2.0

(विनोदी एकांकिका संग्रह)

डॉ. नितीन मोरे

ई साहित्य प्रतिष्ठान

# मुघले ते शोले

## version2.0.2.0

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत

## हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

## असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

## दाम नाही मागत. मागत आहे दाद.

## साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# मुघले ते शोले

version2.0.2.0

लेखक: डॉ. नितीन मोरे

Mobile No. 98209 37490, 98696 73415.

Email - drnmore@yahoo.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : ४ नोव्हेंबर २०२०

©esahity Pratishthan®2020

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची-लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

## डॉ. नितीन मोरे



डॉ. नितीन मोरे हे व्यवसायाने डॉक्टर असून वसई, मुंबई येथे श्वसनरोग तज्ञ म्हणून सुप्रसिद्ध आहेत. त्यांना मराठी व इतर भाषा विषयांची आवड असल्याने त्यातूनच लिखाणाची आवड निर्माण झाली. सामान्यत: आजूबाजूच्या दैनंदिन घटनांतील विसंगती व त्यातून निर्माण होणारा विनोद हा त्यांचा आवडता विषय आणि त्यातून उपरोधात्मक लिखाण आणि मर्मभेदी टिप्पणी करण्यात ते माहीर आहेत. त्याचबरोबर आजूबाजूच्या व्यक्तीमधले नेमकेपण हेरून त्यावरही ते हीतात. त्यांच्या लेखनाचा कॅनव्हास नवनवीन प्रयोगांतून कायम विस्तारत असतो. त्यात पत्रलेखन, विज्ञानकथा, कहाण्या, नाटके, एकांकिका, नाट्यछटा, प्रेमकथा हे सर्व असते.

नेहमी दिवाळी अंकातून डॉक्टरांच्या विनोदी कथा प्रकाशित होत असतात. ई साहित्यवर त्यांचे हे सत्ताविसावे पुस्तक प्रकाशित होत आहे. त्यांचा स्वतःचा असा एक वाचकवर्ग आता निर्माण झाला असून तो त्यांच्या पुस्तकांची वाट पहात असतो.

**Mobile No. 98209 37490, 98696 73415.**

**Email -** drnmore@yahoo. com

# मराठी मुगल-ए-आझम!

मुगले आझम! काही दशकांपूर्वी आलेला काही शतकांपूर्वीच्या सलीम अनारकलीच्या असफल प्रेमाची कथा सांगणारा चित्रपट.

काळ बदलला..भाषा बदलेल.. इतिहास बदलण्याची हौस आहे आम्हाला तर तो ही पण बदलू शकेल.. म्हणजे गोष्ट पण बदलू शकेल!

असफलतेवर मात करणारी आजची पिढी.. अशातशाने हार मानेल? मराठीत मुगले आझम येऊ घातलाय.. हा मेनस्ट्रीम सिनेमा.. यात ट्रॅजेडीला स्थान नाही! तेव्हा ही सलीम अनारकलीची कहाणी सुफळ संपूर्णच होणार!

त्याचे संवाद संक्षिप्त लिहून तयार आहेत.. सिनेमा लॉकडाऊन संपल्यावर होईल तेव्हा होईल!

१

स्थळ: अकबर बादशहाचे घर..

अकबर: महाराणी जोधा.. कुठे गेली शोधा! शादीआधी हरवली असतीस तर शोधाबाई ठेवले असते नाव.. शोधा.. शोधूबाई.. नाही माझी जोधा.. जोधू..

(जोधा पदर सावरत आत येते..)

जोधाबाई: काय महाराज.. इकडून बोलावणे झाले?

अकबर : (आधी उभा होता त्या जागेकडे बोट दाखवत..) नाही राणी.. इकडून नाही.. तिकडून..

जोधाबाई: काहीतरीच तुमचे जहांपनाह.. का बोलावत होतात? तब्येत तर नासाज नाही ना?

(अकबर शिंकतो..जोधाच्या पदरास नाक पुसत .. )

अकबर: तुमच्या कॉटनच्या साडीने नाक नीट पुसले जायचे.. ह्या रेशमी भरजरी साडीचा काय उपयोग..

जोधाबाई: आलमगीर.. आपण म्हणता तर बदलून येऊ..

अकबर: नको.. राहू देत..

जोधाबाई: राहू देते पण.. या साडीला नाक नका पुसू जहांपनाह.. ही नेसून दरबारात जायचेय.. तेव्हा.. त्यापेक्षा आपल्या खिशात ठेवलेल्या रूमालाने नाक पुसावे जहां पनाह..

अकबर: ठीक आहे.. सर्दीने नाकात दम आणलाय नुसता..

जोधाबाई: तरी सांगत होते..जहापन्हा- पिऊ नका.. थंडपन्हा.. थंड कैरी पन्हा पिल्याने सर्दी ही होणारच जहापन्हा. पण माझे मेलीचे इथे ऐकतेय कोण..

अकबर: खरेच.. पण कैरी पन्हे आमचा वीकपॉईंट महाराणी..

जोधाबाई: असू देत..आता सर्दीमुळे वीकनेस येईल.. तेव्हा सेवकास सांगून दवा मागवते..

अकबर: दवा नाही.. दुवा.. दुवा की जरूरत है हमे जोधा..

जोधाबाई: जहांपनाह.. ( टाळी वाजवते.. कोण आहे रे तिकडे बोलण्याआधी )

अकबर: जोधाबाई.. आम्ही दुवा म्हणालो म्हणून तुम्ही इतक्या खूष झाल्यात? की अगदी टाळ्या पिटताय?

जोधाबाई: नाही आलमगीर.. आम्ही डॉक्टरांस बोलावण्यासाठी..

अकबर: हुं.. डॉक्टर नको.. आम्हास हकीम हवा.. BUMS.. ब्रिज कोर्स केलेला.. त्यास सारे काही येते.. त्याच्या दवाने आम्ही बरे होऊ..

जोधाबाई: त्याच्या हाताला तरी यश येऊदे.. सर्दी बरी झाली की आम्ही देवीस..

अकबर: नको.. नवस बोलावा इतकी तब्येत बिघडली नाही अजून.. बोलायचाच तर सलीमच्या अभ्यासासाठी बोला नवस.. सर्दी लवकर बरी होवो.. मग आम्हास सलीम युवराजांचा अभ्यास घ्यायचा आहे महाराणी..

जोधाबाई: ( टाळी वाजवत ) कोण आहे रे तिकडे..

( शिपाई आत येतो )

जोधाबाई: आजच्या आज.. नाही आताच्या आता.. ताबडतोब .. कल करे सो आज कर. आज करे सो अब.. ऑन कॉल हकीमांस बोलावा..

शिपाई: जो हुकूम हुजूर..

२

स्थळ: अकबराचे घर..

जोधाबाई: कसे वाटते जहांपनाहांस?

अकबर: आता आम्ही ठीक आहोत.. त्या हकीमांच्या जडीबुटीने आराम पडतो आम्हास.. अभ्यास घ्यायला मोकळे आम्ही आता.. बोलवावे सलीमला. आज वेळ आहे.. तर आज त्यांना बेरीज वजाबाकी शिकवतो आम्ही..

जोधाबाई: सलीम शहजाद्यांचे लक्ष खेळण्यात जास्त हे खरे..

अकबर: त्यास उडाणटप्पूपणा म्हणतात महाराणी..

जोधाबाई: महाराजांनी डोक्यात राग घालून घेऊ नये.. युवराजांस नाही जमले तर.. धीराने घ्यावे..

अकबर: जोधाबाई.. आम्हाला सगळ्या जगावर राज्य करता येईल पण त्या सर्दीपाठोपाठ या युवराजाने नाकात दम आणला आहे..

जोधाबाई: असे बोलू नये या जगावर राज्य करणाऱ्याने.. पण जरा सबूरीने..

अकबर: सबुरी सबुरी सबुरी.. त्यांना शिकवणारे पाच पाच शिक्षक पळून गेले.. शेवटी त्यांना शिकवण्याची जिम्मेदारी आम्ही उचलली..सबुरी कसली मजबुरी.. आणि..

जोधाबाई: आम्ही समजतो जहांपनाह ची मजबुरी..हाय हाय ये मजबूरी.. पण.. एक दरख्वास्त होती..

अकबर: बोलावे राणी..

जोधाबाई: कारभारी जरा दमाने..

अकबर: आम्ही कोशिश करू तुम्हास तोशिस पडू नये याची..

जोधाबाई: सलीम शहजाद्यांस सोपे सोपे आधी शिकवावे.. उदा.. आलिफ.. बे..

अकबर: आम्ही दरवेळी तिथूनच सुरू करतो महाराणीसाहेबा.. आलिफ.. बे..यातच अडकतो.. मग बे.. बेरीज वजाबाकी पर्यंत कसले पोहोचतोय आम्ही..

जोधाबाई: धीर सोडू नये जहांपनाह..

अकबर: खरंय तुमचे.. धीर सोडू नये.. आलिया भोगासी..

३

घरातील टेबल खुर्ची.. समोर पुस्तक उघडून बादशहा. छोटा सलीम उड्या मारतोय.. मध्येच बसतोय..

अकबर: सलीम.. सलीम.. अरे दोन आणि दोन बरोबर पाच नाहीत.. तीन आणि तीन सात नाहीत..

( सलीम खाली डोके करून उभा राहतो.. जीभ दाखवून चिडवत..)

सलीम: हम वो हैं जो दो और दो पांच बना दे..

( जोधाबाई आत येत )

जोधाबाई: सलीम.. नीट अभ्यास कर.. जहांपनाह चे डोके नको खाऊस..

अकबर: नाही नाही..अजिबात लक्ष नाही याचे.. कसे होईल..

जोधाबाई: करेल तो अभ्यास.. करशील ना बेटा?

( सलीम परत जीभ दाखवून माकडासारख्या उड्या मारतो. )

अकबर: आता एकच उपाय.. यांना पाचगणीच्या शाळेत पाठवणे..

जोधाबाई: नको महाराज.. ह्या आईची ममता भीक मागते.. आम्ही युवराजास डोळ्यासमोरून नाही हलू देणार..नेहमीच युवराज आमच्या नजरेसमोरच असतात.. ( आजूबाजूला पाहात..) कुठे गेला?

जोधाबाई: अरे सलीमा.. गेलास कुठे गनिमा.. दिसत नाहीस तो..

सलीम: ( जवळच्या कपाटावर चढलेला ) मम्मी.. मी इथेय..

अकबर: मम्मी..? त्वचासे तुम्हारी उम्र का पता ही नहीं चलता..

जोधाबाई: ( लाजत ) जाओ.. जहापनाह.. ये संतूर कही और बजाओ.. मी पाहते या सलीमकडे..

अकबर: नहीं.. मेरा हुकूम..

जोधाबाई: इस्पीक?

अकबर: की बदाम?

जोधाबाई: ( लाजत ) आलमगीर.. तुम्हीसुद्धा ना.. अस्से आहात.. आम्ही नाही जा.. जरा सलीमचा तर ठेवा खयाल..

अकबर: तेच करतोय.. नाहीतर सलीम.. तुम्हावर फक्त पत्ते खेळायची वेळ येईल. उद्याच्या उद्या यांना रवाना करा.. पाचगणीच्या बोर्डिंगस्कूलात..

जोधाबाई: महाराज.. ही माता भीक मागते.. सलीम इज अ बीट हूड.. अल्टिमेटली चाइल्डहूड..

अकबर: नाही.. हा या आलमगीरचा हुकूम आहे.. सलीमला तालीम द्यायचा हाच एक जालीम उपाय आहे.. शिपाई..

( टाळी वाजवत )

( शिपाई आत येतो )

शिपाई: हुकूम

अकबर: युवराजांना पाचगणीच्या बोर्डिंगात दाखल करा..

शिपाई: जो हुकूम..

( जोधा डोळ्यांना पदर लावते )

अकबर: नाही राणी सरकार.. नाही.. रेशमी साडीस नीट पुसता येत नाही नाक.. हा घ्यावा रूमाल..

( जोधा रूमाल घेते हातात.. दीर्घ वास घेत..)

जोधाबाई: आपल्या प्रेमाची खुश्बू आहे यात..

अकबर: होय.. आम्ही नाक पुसले त्यावर.. आणि हकीमांनी दिलेले निलगिरीचे थेंब आहेत यावर..

जोधाबाई: जहांपनाह..

४

स्थळ: अकबर बादशहाचे घर..

( मध्ये बारा वर्षे उलटून गेलीत.. पाठीमागे भिंतीवरी कालनिर्णय कॅलेंडर.. डिसेंबर १५८६ )

जोधाबाई: जहांपन्हा.. सलीमची याद सतावते आम्हास..

अकबर: आम्हास ही.. पण जेव्हा आठवण येते तेव्हा आमच्यातला शहेनशहा बापावर वरचढ होतो.. हे तख्त सांभाळण्यासाठी सलीम तयार होण्यासाठी हा निर्णय घेणे भाग होते..

जोधाबाई: आणि ह्या मातेस पुत्रवियोग..

अकबर: लवकरच सलीम परत येईल महाराणी साहेबा.. तिकडून निरोप होता.. युवराज  कॉपी न करता पास होत आलेत.. इकडील हूडपणा तिकडे नाहीसा झाला आहे.. युवराज आता लवकरच परततील..

जोधाबाई: माझे डोळे त्यांच्या वाटेकडे सदैव लागलेत.. सलीम येईल.. किती मोठा झाला असेल.. मग त्याचे लग्न लावून देऊ म्हणजे आम्हाला पण हाताखाली कोणी मिळेल.. मग आम्ही रोजच्या सीरियल बघण्यास मोकळया..

अकबर: वा! किती सुंदर स्वप्ने पाहता राणीसरकार..

जोधाबाई: खरेय जहांपनाह.. रोज त्या 'ज्वाला बन गई ज्योती' सीरियल मध्ये ती ज्वाला आहे ना तिच्या साडीसारखी साडी घ्यायची मला. बरोबर कुणी असेल तर.. एकदा सलीमचा निका लावला..

अकबर: निकाल?

जोधाबाई: निकाल नाही शहेनशहा.. निकाह..

अकबर: तेच ते.. एकच दोन्ही.. निकाह.. कुणा बरोबर?

जोधाबाई: शहजाद्यांसाठी स्थळांची काय कमी? नाहीतर अगदी जीवनसाथी डॉट कॉम वर टाकू..

अकबर: ठीक महाराणीजी.. प्रथम सलीमला परत तर येऊ द्यात..

जोधाबाई: येणार शहजादे.. आम्ही वाट पाहात आहोत.. सलीम.. किती मोठा झाला असेल.. माझा सलीम..

अकबर: मोठा.. हो ना.. आणि इतकाही नसावा की कुण्या गर्लफ्रेंडला घेऊन यावा..

जोधाबाई: जहांपनाह.. माझा सलीम तसा नाही.. तो माझ्या आज्ञेबाहेर नाही..

अकबर: खरंय महाराणी.. दिसेलच लवकर..

( शिपाई येतो )

शिपाई: सलीम शहजादे येत आहेत सरकार..

( सलीम येतो.. पाठोपाठ दोन शिपाई..)

अकबर: या सलीम.. युवराज सलीम यावे.. यावे..

( आतून ओवाळण्याचे तबक घेऊन दोन दासी येतात. एक ओवाळते . दुसरी दासी मागे उभी राहून पाहते.. सलीमची नजर तिच्यावर पडते.. मागून प्लेबॅक.. तुमको देखा तो ये जाना सनम..)

जोधाबाई: युवराज.. विश्राम करावा..कित्येक वर्षांनी पाहतो आहोत तुम्हांला..

सलीम: हो ना.. ( पाठीमागच्या दासी कडे चोरून पाहात ) खूप गोष्टी बदलल्यात इकडे मम्मी.. आज जेवण काय आहे?

जोधाबाई: आज खास गाजर का हलवा आणि कलेजे का खिमा बनविला आहे ..

सलीम: मम्मी.. तुझ्या हातचे खाऊन कित्येक वर्षे झाली.. आज जेवणार मी पोटभर..

जोधाबाई: ठीक.. तोंडबिंड धू.. अनारकली.. सलीमला नवीन बाथरुम दाखव..

सलीम: नवीन बाथरुम मॉम?

जोधाबाई: होय सलीम.. नवीन. फुल्ली टाइल्ड विथ लेटेस्ट अॅटॅचमेंट्स आणि बाथटब..

सलीम: ( अनारकली.. म्हणजे ती मागची दासी.. तिच्याकडे पाहात..) होय.. मला पाहायलाच हवी.. नाही पहायलाच हवे..

( अनारकली आणि सलीम जातात. जोधाबाई त्याच्याकडे बघत राहते.. )

५

स्थळ : बाथरुम..

अनारकली हातावर पाणी टाकतेय.. सलीम हात धुतोय.. पाठीमागे पाणी बचावचे पोस्टर लावलेले.. 'पानी की हर बूंद कीमती है' लिहिलेले.

काही मिनिटे अशीच जातात.

सलीम: नाव काय तुझे?

अनारकली: या नाचीजला अनारकली म्हणतात.

सलीम: डाळिंबाची कळी?

अनारकली: शहजादे फार विनोदी आहेत असे ऐकून होते.. आज प्रत्यक्ष पाहिले..

( पाणी टाकतच राहते )

सलीम: अजून किती पाणी टाकणार आहेस अनारकली?

अनारकली: आपण नाही म्हणत नाही तोवर शहजादे..

सलीम: ठीक.. पुरे.. पुरे..

( ती टॉवेल देते.. एक टोक हाताने पकडून उभा राहातो )

सलीम: बाथरुम सुंदर बनवलेय फार..

अनारकली: होय, शहजादे सलीम.. माझे बाबा इथले मुख्य गवंडी आहेत..

( तिच्याकडे पाहात.. )

सलीम: वा! सुंदर! राज गवंडी? गवंड्याकडे जादू आहे असे दिसते..

( अनारकली लाजून बाजूला पाहते.. टॉवेल हातात देत..)

अनारकली: हुजूर

सलीम: ....

अनारकली: टॉवेल.. हुजूर..

सलीम: सुंदर..

अनारकली: काय हुजूर?

सलीम: हो.. हा सुद्धा सुंदर आहे.. टॉवेल सुंदर.. बाथरुम सुंदर.. बाथटब सुंदर .. गवंडी सुंदर.. तू सुंदर..

( लाजून बाजूला बघत उभी राहते, पायाच्या अंगठ्याने जमीन उकरत..)

सलीम: आम्ही इतकी वर्षे बाहेर राहिलो.. कधी असले अनुपम सौंदर्य नाही पाहिले.. वा!

अनारकली: हुजूर मी बाबांना सांगते..

सलीम: काय? आमचे नाव?

अनारकली: काहीतरीच काय.. हेच.. आपल्याला बाथरुम आवडले फार.. आपण कौतुक करत होतात म्हणून..

सलीम: छान.. फारच छान.. आणि हे बाथरुमबद्दल नाही..

अनारकली: कळलं मला.. टॉवेल बद्दल आहे ना?

सलीम: टॉवेलबद्दल नाही..

अनारकली: सॉरी हुजूर.. बाथटब..

सलीम: अनारकली.. बाथरुममधून बाहेर येशील जरा..

अनारकली: हुजूर.. मी बाहेरच उभी आहे..

सलीम: छान.. छानच.. सुंदर.. अलौकिक.. आणि काय ते विचारू नकोस..

अनारकली: नाही विचारत शहजादे..

सलीम: अप्रतिम.. आवडली मला..

अनारकली: आता विचारू हुजूर काय ते?

सलीम: काय नाही.. कोण विचार अनारकली..

अनारकली: कोण हुजूर?

सलीम: इथे कोण आहे?

अनारकली: तुम्ही हुजूर..

सलीम: मी सुंदर आहे?

अनारकली: हा कसला प्रश्न हुजूर..?

सलीम: बोल.. अजून कोण आहे?

अनारकली: अजून कोणी नाही हुजूर..

सलीम: मग तू कोण आहेस.. भूत?

अनारकली: ( हातपाय सुलटे असल्याचे दाखवत..) नाही हुजूर.. भूत नाही..

सलीम: आता ऐक.. अनारकली..

अनारकली: होय हुजूर..

सलीम: तू सुंदर.. तुझे हरणासारखे डोळे.. पोपटासारखे ओठ.. लांब गोरे गोरे केस.. काळे काळे गाल..

( अनारकली खाली पाहात उभी..)

सलीम: काही चुकले का? चुकलेच.. गोरे गाल.. काळे काळे केस.. गजगामिनी.. सिंहकटी.. कुंदकळ्यांसारखे मोतीदंती..

अनारकली: अय्या.. विको वज्रदंती.. टूथपावडर टूथपेस्ट..

सलीम: कर्म.. अनारकली.. मी तुझे कौतुक करतोय नि ..

अनारकली: शहजादे.. मी कुठे आपण कुठे..

सलीम: अनारकली.. मी इथे नि तू ही इथेच..

अनारकली: इश्श..

सलीम: वा! खुदा जब हुस्न देता है.. नजाकत आ ही जाती है! आज संध्याकाळी.. माझ्या या घराच्यापाशी थांब तू गडे जराशी..

अनारकली: इश्श.. म्हणजे डेट?

( लाजत पळून जाते आत.. टॉवेल हातात घेऊन उभा सलीम.. जोधाबाई आत येतात.. )

जोधाबाई: इतका वेळ सलीम..?

सलीम: हो ना.. मम्मी.. मळलो होतो ना खूप.. तेव्हा लाइफबॉयने हात धुतले.. तंदुरूस्ती की रक्षा.. ( आत पाहात ) करता है लाइफबॉय.. छान आहे हां..

जोधाबाई: काय? लाइफबॉय?

सलीम: नाही.. बाथरुम.. मम्मी

जोधाबाई: बरंय चल.. जेवायला. जहांपनाह वाट पाहात आहेत..

सलीम: चला मातोश्री..

६

राजवाड्यामागील जागा.. पाठून झोपाळ्यावाचून झुलायचे हे बॅकग्राऊंड म्युझिक.. अनारकली आणि सलीम दोघे उभे..

सलीम: अनारकली, आज तुला काही महत्वाची गोष्ट सांगायची आहे अनारकली..

अनारकली: अय्या.. गोष्ट! मला ना गोष्ट ऐकायला खूप खूप आवडते.. गोड गोष्टी.. गोड गोड गोष्टी.. त्यात एक राजकुमार असतो.. तो घोड्यावर स्वार.. अबलख वारू वरून येतो.. टाचा टाकीत.. वाट पाहतेय तिथे एक राजकन्या.. की नुसतीच कन्या? तो येतो.. तिला पाहतो.. आणि म्हणतो..

सलीम: काय म्हणतो अनारकली?

अनारकली: म्हणतो.. बाथरुम फार सुंदर आहे हो..

सलीम: अनारकली.. बाथरुममधून बाहेर ये..

अनारकली: जो हुकूम शहजादे..

( दोन पावले पुढे येत ) आले बाहेर..

सलीम: आणि म्हणतो मग.. तू माझी राणी होणार का?

अनारकली: अय्या.. किती रोमॅन्टिक.. राजकुमार असे म्हणतो तर ती कन्या म्हणते..

सलीम: काय म्हणते अनारकली..?

अनारकली: म्हणते.. म्हणते.. अय्या.. मी नाही जा..

सलीम: बोल बोल अनारकली.. काय म्हणते ती राजकुमारास?

अनारकली: म्हणते.. म्हणते.. बाबांना विचारून सांगेन..

सलीम: बाबा म्हणजे.. ते गवंडी?

अनारकली: अय्या.. सर्वच मुलींचे बाबा काय गवंडी असतात?

सलीम: सर्वच मुलींना नाही विचारत हा सलीम.. अनारकली.. तुला विचारतोय..

अनारकली: अय्या..! काहीतरीच!

सलीम: काहीतरीच काय? या राजवाड्याच्या मागे तुला मी का बोलावले असेल?

अनारकली: माहितीय मला..

सलीम: मग सांग.. अनारकली.. सांग..

अनारकली: आम्ही नाही जा..

सलीम: सांग ना..

अनारकली: माहितीय.. डेटवर.. अय्या मला लाज वाटते..

सलीम: ऐक बाला.. तुला पाहताच कलिजा खलास झाला..

( रडू लागते )

सलीम: काय झाले अनारकली?

अनारकली: कोणी खलास झाले की मला रडू येते..

सलीम: अनारकली.. कलिजा खलास म्हणजे..

अनारकली: गेला.. खलास.. संपला? कलिजा म्हणजे ते मटणातला ना? मी सांगेन.. राज बल्लवांस.. नवीन कापा बोकड.. नवीन येईल कलिजा..

सलीम: अनारकली.. आम्ही आमच्या कलिज्याबद्दल बोलत आहोत.. तुला पाहून वाटले..

अनारकली: अय्या..

सलीम: अय्या काय? पुढे बोलू तर दे अनारकली.. तुला पाहून वाटले.. तूच माझ्या दिलकी रानी.. मी मग माझे दिल तुला देऊन टाकले..

अनारकली: नाही शहझादे.. नाही.. तुम्ही फक्त तो टॉवेल परत दिला..

सलीम: अनारकली.. असे वाटते आपण इथे असेच बोलत रहावे..

अनारकली: अनंत काळ..

सलीम: खरंय अनारकली.. तू अशीच बोलत राहिलीस ना तर अनंत काळ ही पुरणार नाही आपल्या प्रेमालापास..

अनारकली: अय्या.. मला किनई लाज वाटते.. आणि मला उशीर होईल.. मी जाऊ..

सलीम: अनंत काळ संपला का अनारकली?

अनारकली: शहजादे सलीम.. ठाऊक नाही.. माझ्या घड्याळाचा सेल डाऊन आहे.. पण मला जाऊ द्यावे.. जाऊ द्याना घरी वाजले की बारा..

सलीम: वा! काय आवाज तुझा अनारकली.. वाटते जशी कोकिळा गातेय.. पक्षी मधुर कूजन करताहेत.. वा!

अनारकली: पूजन? या अल्ला.. कसली पूजा?

सलीम: अनारकली.. पूजन नाही.. कूजन.. वाटते तुझ्याबरोबर असेच बसून रहावे.. प्रेमाच्या गप्पा मारीत.. तू आणि मी.. मी तख्ताचा वारसदार.. तू माझी मल्लिका.. महाराणी अनारकली..

अनारकली: अय्या.. आम्ही नाही.. मी जाते.. खूप कामे बाकी आहेत शहजादे..

( धावत निघून जाते.. सलीम बघत राहतो तिला जाताना..)

७

बादशहा अकबराचे घर.. जोधाबाई आणि मानसिंग दोघेच आहेत.

मानसिंग: महाराणीजी आपले लक्ष नाही

जोधाबाई: बोला मानसिंगजी.. कशात लक्ष नाही? आमचा सलीम आल्यावर आमचे ध्यान कशात नाही..

मानसिंग: तेच सांगत आहे.. त्याच्यावरच ध्यान ठेवावे महाराणी.. त्यांची लक्षणे..

जोधाबाई: असे काय केले सलीमने?

मानसिंग: आमची खबर पक्की आहे.. राजवाड्याच्या मागे रोज शहजादे..

जोधाबाई: काय? राजवाड्यामागे?

मानसिंग: होय राजवाड्यामागे..

जोधाबाई: पण काय?

मानसिंग: रोज राजवाड्यामागे.. सलीम शहजादे.. त्या नाचीज लौंडीस भेटतात..

जोधाबाई: काय? कोण आहे ती? कळू देत आम्हास तिचे नाव..

मानसिंग: मन घट्ट करून ऐकावे.. महाराणी.. ती आहे अनारकली..

जोधाबाई: काय? अनारकली? एका गवंड्याची मुलगी? राजकुमारांना काय कमी होती मुलींची? अगदीच काही नाही तर कुठल्याशा वधूवर सूचक केंद्रात नाव नोंदवले असते.. अजून काय काय स्वप्ने पाहिली.. सलीम.. हे तू काय करतो आहेस.. आधी वर्षानुवर्षे तिकडे जाऊन राहिलास.. आता एका मुलीच्या मागे.. माझ्या ममतेची ही अशी दशा व्हावी? सलीम.. सलीम..

( अकबर येतो..)

अकबर: महाराणी जोधाबाई.. आपण चिंताक्रांत दिसता? मानसिंग.. काय झाले?

मानसिंग: शहेनशहा.. आपण या पृथ्वीचे मालिक.. आलमगीर.. जहांपनाह.. आपल्या शहजाद्यांचे..

अकबर: काय.. बोलावे पुढे..

मानसिंग: त्यांचे लफडे आहे..

अकबर: खामोश! राजघराण्यातील व्यक्ती असे करूच नाही शकत.. लफडे? प्रकरण असेल..

जोधाबाई: का नाही करू शकत जहांपनाह.. आमचे शहजादे काय नाही करू शकत?

अकबर: कोण आहे ती लौंडी?

जोधाबाई: अनारकली

अकबर: मग ठीक आहे.. ( एकाएकी सावरत ) क्काय?

जोधाबाई: आपल्या राजगवंड्याची मुलगी..आपणास ठाऊक आहे ती?

अकबर: आमच्या नजरेतून कोणी सुटत नाही.. जशा या जोधाबाई.. सुटल्या नव्हत्या..

( जोधाबाई लाजतात.. मानसिंग नजर चुकवून दुसरीकडे पाहातो )

मानसिंग: म्हणजे शहेनशहांना सारे ठाऊक आहे?

अकबर: सारे? म्हणजे अजून काय?

मानसिंग: सलीम आणि अनारकलीच्या जोडीबद्दल?

अकबर: आम्हास नाही ठाऊक असे या भूमंडळी काय आहे..

मानसिंग: खरंय शहेनशहा.. खरंय..

अकबर: खरंय हे खरेच आहे मानसिंग.. पण याबाबतीत मात्र आम्हास खरेच काही नाही ठाऊक..

मानसिंग: ऐकावे.. जहांपनाह.. रोज राजवाड्यामागे शहजादे सलीम अनारकलीस भेटतात..

अकबर: खामोश! त्या गवंड्याची मुलगी.. हिंदुस्थानची मलिका बनण्याची स्वप्ने पाहात आहे की काय?

जोधाबाई: महाराजांनी इतकेही कठोर होऊ नये.. सलीम अजून लहान आहे.. नादान आहे..

अकबर: लहान? त्याच्या वयाचे असताना आमच्या तीन शाद्या झालेल्या तोवर.. आणि नादान? ते काही नाही.. मानसिंग.. आमचा हुकूम आहे.. शहजादे सलीम यांना उच्च शिक्षणासाठी पाठवून द्या बाहेरील देशात..

जोधाबाई: नाही शहेनशहा.. माबदौलत.. आलमगीर.. इतके कठोर होऊ नका.. आमच्या शहजाद्यांस अजून एकदा आमच्याहून दूर नेऊ नका..

अकबर: महाराणी जोधाबाई.. आम्ही नाही नेले दूर तर ती कवडीमोलाची गवंडी कन्यका नेईल दूर.. आमचा हुकूम.. मानसिंग.. आमचे फर्मान जारी करा.. आता..

मानसिंग: हुकूम हुजूर..

( मानसिंग जातो..)

जोधाबाई: महाराज.. मोठ्या नवसासायासाने झालेल्या सलीमला ही कसली अवदसा आठवली.. आणि माझ्या सलीमला माझ्यापासून परत दूर करत आहे ती.. अनारकली.. सलीम तूने क्या किया जालीम..

८

सलीमची खोली.. दुर्जन, सलीमचा खास सेवक आणि सलीम दोघेच आहेत..

दुर्जन: शहजादे सलीम, शहेनशहा नी हे पत्र पाठवले आहे..

सलीम: खलिता? एकाच घरात राहून खलिता? मोबाईलवर बोलले असते.. आमचा आणि त्यांचा फेसबुक अकाऊंट आहे.. व्हॉट्सॲप आहे.. पॉप इज आऊटडेटेड.. वाचा.. नाहीतर द्या.. मीच वाचतो..

( घेऊन वाचतो..)

सलीम: एकाएकी काय मनात आले महाराजांच्या? आम्ही नाही दूर देशी जाणार.. आम्हास पोस्ट ग्रॅज्युएशनची काय गरज?

दुर्जन: शहजादे.. एक सांगू..नीट वाचा

सलीम: नीटच वाचले दुर्जन..

दुर्जन: मांजर डोळे मिटून पिते दूध पण इतरांना दिसत नाही असे वाटते तिला..

सलीम: दुर्जन.. इथे मांजर कुठे?.. ओहो.. म्हणजे डॅडना माहिती झाले की काय?

दुर्जन: होय.. शहजादे.. त्यांना खबर मिळाली..रोज रोज एकाच ठिकाणी आपण भेटता.. ते ही सीसी टीव्ही आहेत इथे हे

विसरून..  आणि ते कदापि अनारकलीस आपली सून बनवण्यास राजी होणार नाहीत..

सलीम: आणि दुर्जन.. तुम्हाला वाटते आम्ही दूर देशी निघून जावे?

दुर्जन: ही हिंदुस्थानच्या बादशहांची आज्ञा आहे.. ती कशी मोडणार तुम्ही? शहेनशहाचा हुकूम ही काळ्या दगडावरील रेघ..

सलीम: यू मीन.. पर्मनंट मार्कर? म्हणजे आम्हास जावेच लागेल? दुर्जन.. तू माझा सेवक नाहीस.. जिगरी दोस्त आहेस.. काही तिकडमबाजी कर..

दुर्जन: शहजादे.. तुम्ही कमीतकमी जागा तरी नीट निवडायचीत..

सलीम: काय करू दुर्जन.. पहिल्यांदाच आहे ना..अनुभव नाही.. पण आम्ही अनारकलीस सोडून नाही जाणार.. द्या तो हुकूमनामा..

( हाती घेऊन फाडून फेकतो..)

दुर्जन: युवराज.. हे काय केलेत तुम्ही? शहेनशहाचा आदेश धुडकावून लावताय?

सलीम: आम्ही शहजादे आहोत हाच आमचा गुन्हा.. राज्यात जागोजागी पोरे आहेत.. कोणी असे शिकण्यासाठी बाहेर जात नसेल.. आणि कोणास असे आपल्या जीएफ ला मोकळेपणाने भेटता येत नसेल? एक आम्ही..

दुर्जन: शांत व्हावे शहजादे.. शहेनशहा आता नक्की घुस्सा होतील..

सलीम: हुं.. ते घुस्सा होतच राहतात.. ॲंग्री ओल्ड मॅन.. यंग जेन च्या ॲस्पिरेशन.. दे जस्ट डोन्ट अंडरस्टॅंड.. यू नो.. पण काही करून अनारकली माझीच.. ते काय म्हणतात ना शेंडी तुटो की पारंबी..

दुर्जन: शहजादे सलीम.. तुम्ही काय म्हणता ते समजले.. पण या रस्त्यावर खूप खाचखळगे आहेत.. तुम्हांला हुशारीने काम करावे लागेल.. पण खरा राजपूत म्हणून मी तुमच्या बरोबर आहे आणि असेन.. फक्त माझ्या त्या राजकुंवर बरोबरच्या प्रकरणात..

सलीम: दिली.. आम्ही सर्व मदत करू.. राजकुंवर आणि तुमची जोडी.. आम्ही जातीने लक्ष घालू.. हे चांगलेय.. तुम्ही मला आणि मी तुम्हाला.. म्हणतात ना एकमेका साह्य करू..

दुर्जन: अवघे धरू सुपंथ! पण युवराज सावध रहावे.. काही अनारकलीस दगाफटका तर नाहीना होणार?

सलीम: खरेय.. आम्ही पाहतो.. तुम्हीही लक्ष ठेवा..

दुर्जन: आज्ञा हुजूर!

९

एक छोटीशी खोली.. अनारकलीची. ती खाली बसून मोबाईलवर सागरगोटे खेळतेय. अकबर टांगा टाकत आत शिरतो.. ती दचकून उभी राहते.

अनारकली: या अल्ला.. खुद्द शहेनशहा आले भेटीस.. बादशहा येती घरा.. तोचि.. अकबर: खामोश!

अनारकली: माफी असावी जहांपनाह..

अकबर: अनारकली.. तोड दे दुश्मन की नली.. आमच्या तुझ्याकडून खूप अपेक्षा आहेत अनारकली.. ज्या नजाकतीने तुझे पिताजी महाल बांधतात त्याच नजाकतीने अल्लातालाने बनवले तुला.. आता तू मात्र आम्हाला बनवू नकोस..

अनारकली: नाही खाविंद

अकबर: ह्या सल्तनतीवर राणी बनून राज्य करण्याचे ख्वाब सोडून दे.. अनारकली..

अनारकली: या नाचीज ने हे स्वप्न कधीच नाही पाहिले आलमगीर.. खाविंद फक्त प्रेमाखातर..

अकबर: खामोश!

( अनारकली मागे सरकते..)

अकबर: अनारकली.. कहां चली?

अनारकली: मी इथेच आहे जहांपनाह.. आपली ताकद मोठी.. त्यापुढे आमचा काय पाडाव लागायचा.. आपला हुकूम..डोक्याडोळ्यांवर.. म्हणजे सरआंखोंपर.. आपण फक्त हुकुमावे..

अकबर: हुकुमावे? अनारकली.. हे क्रियापद आहे? आम्हाला पत्ताच नव्हता अजूनही.. छान.. आज सलीमला सांग.. तू त्याच्याशी निकाह लावणार नाहीस.. लावू शकणार नाहीस..

अनारकली: खोटेच? खोटे सांगावे खाविंद?

अकबर: खोटे? नाहीच.. हे सत्य आहे..हे सत्यच आहे .. हे सत्य आहेच आणि हेच सत्य आहे.. या हिंदुस्थानच्या बादशाहच्या हुकुमानुसार हे होणे नाही.. माझी आज्ञा आहे.. तू सलीमला सांग.. तू नाही पाळलीस आज्ञा तर .. तुरूगात पडशील..

अनारकली: खितपत शहेनशहा?

अकबर: हां.. खितपत! मुली, भाषा चांगलीय तुझी.. पण तिचा सलीमवर प्रयोग कर.. सांग त्याला.. तू खोटे नाटक करत होतीस..

अनारकली: पिवळा पीतांबर जहांपनाह?

अकबर: हा कुठून आला आता?

अनारकली: नाटक खोटेच असते जहांपनाह..

अकबर: तू फार हुशार आहेस अनारकली.. आमची आज्ञा पालन कर..

अनारकली: जो हुकूम शहेनशहा.. पण आपण सलीम शहजाद्यांस कां हुकूम देत नाही?

अकबर: खामोश! एका शहेनशहाशी जबान लडा रही हो?

अनारकली: माफी खाविंद.. पण..

अकबर: खामोश.. मुझे और कुछ नहीं सुनना..हा हुकूम आहे आमचा.. हुकुमाची फक्त अंमलबजावणीच हो..

अनारकली: हो.. महाराज!

( अकबर ताडताड निघून जातो..)

अनारकली: परवरदीगार.. क्या इतनी ताकत नहीं दे सकता हमारे शहेनशहा को की उनका बस अपने बेटेपर भी चल सके..

( सलीम येतो..)

सलीम: अनारकली.. पापा आये थे? कशासाठी? मला हुकूम दिलाय देशाबाहेर जाण्याचा.. मी तो फाडून फेकून दिला..

अनारकली: शहजादे.. आपण शहजादे आहात.. मी नाचीज..

सलीम: अनारकली.. तू ना चीज नाहीस.. बटर आहेस .. चीज आहेस.. नाचीज नाहीस..अगदी तू चीज बडी है मस्त मस्त..

अनारकली: तुमचे काहीतरीच शहजादे..

सलीम: काहीतरीच नाही.. पापा काहीही म्हणोत.. मी नाही जाणार ..

अनारकली: पण मी जाणार..

सलीम: कुठे?

अनारकली: आणि कुठे? तुरूंगात..

सलीम: अनारकली..!

अनारकली: आणि जाईन मी हसत हसत तुरूंगात.. प्यार किया तो डरना क्या शहजादे..

सलीम: अनारकली..!

१०

स्थळ: अकबराचे घर. जोधाबाई आणि मानसिंग बाजूला उभे आहेत. आणि

सलीम आणि अकबर समोरासमोर..

अकबर: शहजादे.. आमचा हुकूम आहे.. त्या मुलीला विसरून जा..

सलीम: कैसे पिताश्री..

अकबर: तिला आम्ही कैदेत ठेवले आहे..

सलीम: कैद में है डबलबुल.. म्हणजे बुलबुल?

अकबर: बुलबुल बिलबिल नाही.. अनारकली.. आता ती पडेल तुरूंगात.. काय म्हणतात तशी.. खितपत..

सलीम: डॅड.. द्याट्स अनफेअर..

अकबर: नाही शहजादे.. युद्धात सारे क्षम्य..

सलीम: युद्ध.. पापा युद्ध नाही हे.. हे प्रेम.. प्यार किया तो डरना क्या..

अकबर: खामोश! ये जंग है.. जिंदगी की जंग..असली युद्ध..

सलीम: जंग असो की जंगल.. जंग जंग पछाडले तरी आम्ही नाही जाणार.. मम्मी सांग ना..

जोधाबाई: मी काय सांगू जहांपनाहना सलीम..

सलीम: हेच.. अनारकली..

अकबर: खामोश! तुझी एक्झिक्युटिव्ह क्लासची तिकिटे काढलीत.. अफगाणिस्तानात जा.. मानववंशशास्त्र..

सलीम: होय.. एकदम योग्य ठिकाण डॅड.. जुने- नवे मृतदेह मिळतील सगळीकडे.. वा!

अकबर: शाबास! मला तुझ्याकडून हीच अपेक्षा होती..

सलीम: कसली? डेडबॉड्या शोधण्याची पापा?

अकबर: नहीं रे पगले.. तू अफगाणिस्तानात जाशील..

सलीम: मी.. मी?

अकबर: उच्चविद्याविभूषित होऊन येशील..

सलीम: मी.. मी?

अकबर: आणि आम्ही ऐकलेय.. तिथली राजकन्या खूप खूबसूरत आहे..

सलीम: सूरत असो की बडोदा.. मम्मी..

जोधाबाई: जहांपनाह.. जगावर राज्य करणारे तुम्ही.. आपल्या बच्च्याची एवढी ख्वाहिश नाही पुरी करू शकत..

अकबर: ये राजनीती है.. जोधाबाई..

सलीम: कुछ भी हो.. अनारकलीसे ही होगी मेरी निकाह.. मम्मी..

जोधाबाई: हां बेटा.. देखती हूं..

अकबरः खामोश! सलीम तुम जाओगे.. आणि माझा फैसला आहे.. आणि अनारकलीची सुटका होईल..

सलीमः थ्यांक्स डॅड..

अकबरः पुढे ऐकावे..

सलीमः ऐकतोय.. आय नो डेव्हिल इज इन डिटेल्स..

अकबरः तर अनारकली सुटणार.. अजून बारा तास आहेत.. मानसिंग..

मानसिंगः जी हुजूर..

अकबरः राजगवंड्यास तयार रहावयास सांगा.. या राजवाड्याबाहेर एक भिंत बांधायची आहे..

मानसिंगः जो हुकूम

अकबरः अनारकलीचे स्मारक..

सलीमः स्मारक? डॅड.. ते गेलेल्याचे..

अकबरः जाईल.. त्यात अनारकली चिणून मारली जाईल.. हा हुकूम आहे आमचा.. राजगवंड्यास स्वतःच्या हस्ते बांधू देत ती भिंत.. आपल्याच मुलीचे स्मारक..

मानसिंगः शहेनशहा..

अकबरः हुकुमाची अंमलबजावणी व्हावी.. ना रहेगा बास न रहेगी बांसुरी..

सलीमः बजेगी डॅड..

अकबर: कैसे.. बिना बांस के.. बिना बांस कैसे बजेगी?

सलीम: ते नाही पापा.. ना बजेगी बासुरी असा खरा वाक्प्रचार आहे..

अकबर: तू त्या अनारकलीकडून भाषेचे क्लासेस लावलेस काय?

सलीम: काय पण डॅड.. आम्ही काय रोज हे बोलणार? हाऊ अनरोमॅन्टिक..

अकबर: काय?

सलीम: काय नाय..

अकबर: तर ती भिंत.. अनारकली तिच्यात गाडली जाईल.. मग तुला अफगाणिस्तानात न जायला कारण उरणार नाही..

सलीम: मम्मी..

जोधाबाई: उगी उगी बाळा.. आपण जहांपनाह चे घर उन्हात बांधू हां..

सलीम: त्या भिंतीच्या बाजूला..?

११

स्थळ: अकबर बादशहाचे घर.

जोधाबाई तांदूळ निवडत बसलीय.

अकबर बाजूला बसलाय.. उर्दू पेपर 'दरबार ए दिल्ली'ची आग्रा पुरवणी वाचत.. तीही उल्टा पेपर पकडून! जाड भिंगांचा चष्मा लावून. बादशाहचे लक्ष नाही..

जोधाबाई: काय हो.. त्या अनारकलीस चांगलीच शिक्षा फर्मावलीत.. बिचारी कोंडली गेली असेल..

अकबर: असेल नाही गेलीच.. आमच्याशी गुस्ताखीची सजा मिळणारच..

जोधाबाई: चांगली होती.. सलीमला आवडायची..

अकबर: उसे अफगाणिस्तानसे राजकन्या आणू.. गवंड्याची पोर या सल्तनतची महाराणी..

जोधाबाई: सलीम उदास झालाय.. दिसला नाही सकाळपासून..

अकबर: तुम्ही चिंता नका करू.. विसरेल तिला..

जोधाबाई: विसरला तर ठीक..

अकबर: तो नाहीतर त्याचा बाप विसरेल!

जोधाबाई: तुम्ही?

( सलीम आणि अनारकली दोघे घरात शिरतात.. लग्नाचे कपडे अंगावर.. गळ्यात मोठाले हार..)

सलीम: ( जोधाबाईच्या पाया पडत )
आम्हाला आशीर्वाद दे मम्मी..
( अकबर दचकून पेपर बाजूला ठेवतो..)
अकबर: सलीम.. इतक्यात निकाह उरकूनही आलास..कालच्या अनारकलीला विसरला लगेच.. ( बाजूला अनारकलीला पाहून दचकतो ) अरे अनारकली.. की छिपकली.. की तिची जुळी बहीण..
अनारकली: हमे आशीर्वाद दो मामंजी..
सलीम: पापा.. असे कन्फ्यूज नका होऊ.. ही ओरिजीनलच आहे..डुप्लिकेट नाही.. हीच ती भिंतीत चिणलेली.. हंड्रेड पर्सेंट जेन्युईन.. पुनर्जीवित..
अकबर: काय कसे काय बुवा जमलं तुला?
सलीम: सिंपल डॅड.. प्यार किया तो डरना क्या..
अकबर: म्हणजे..
सलीम: आम्ही नाही सांगणार.. सिक्रेट..

अकबर: हिंदुस्थान की सलतनतीच्या सर्वशक्तिमान राजापासून काही लपत नाही शहजादे.. तुम्ही सांगण्याआधी आम्हास ठाऊक होईलच.. आणि अशी कोणती गोष्ट आहे जी आम्हाला ठाऊक नाही?

सलीम: सर्व काही.. फक्त एक गोष्ट.. त्या भिंतीखालील रातोरात आम्ही खणलेले भुयार सोडून पापा.. आणि आता निकाल लागलाय.. निकाह झालाच.. अनारकली हॅज ऑलरेडी बिकम मिसेस अनारकली सलीम..

जोधाबाई: मी काय म्हणते.. आहे पोराची हौस तर..

अकबर: हौस..? हे काय खेळणे आहे..

जोधाबाई: असू देत..नाहीतर नसू देत.. आली पावलांनी लक्ष्मी चालत.. नाव घे तर मुली..

अनारकली: अय्या.. लाज वाटते..

जोधाबाई: कसली गं..

अनारकली: अय्या.. सलीमचे नाव घ्यायला लाज वाटते..

जोधाबाई: लाजू नकोस.. नाव घ्यावेच लागेल.. तशी रीत आहे आपली..

अनारकली: लाज वाटते.. तरी घेते.. मी होती अशी भिंतीमध्ये चिणून.. मी होते अशी भिंतीमध्ये चिणून.. आणि सलीमराव गेले भुयार खणता खणता शिणून..

जोधाबाई: दृष्ट लागेल गं.. आता सलीम..

सलीम: ये क्या ममा.. हम नहीं लेंगे नाम बिम.. अनारकलीका..

जोधाबाई: घ्यायलाच लागेल.. राजघराण्यातील रस्म आहे.. नवी बहू आली तर..

सलीम: ठीक. पण हसू नको.. भाजीत भाजी..

जोधाबाई: हा नको उखाणा.. ही भाजी खाऊन थकले मी.. माझ्या लग्नात पण बादशहांनी हाच घेतलेला उखाणा.. ती कडू मेथीची भाजी म्हणे!

सलीम: मग हा ऐक..मेथी नाही काही.. मी केनिकुर्डुची भाजी म्हणणार होतो..

जोधाबाई: चालणार नाही.. दुसरा घे उखाणा..

सलीम: ठीक .. ऐक.. हत्तीवर अंबारी तिच्याखाली झूल.. आणि अनारकली माझे गुलाबाचे फूल..

अकबर: यू फूल..

जोधाबाई: वा! शोभते अगदी जोडी.. हो की नाही जहांपनाह..

अकबर: खामोश! ये क्या हो रहा है..

जोधाबाई: खामोश बिमोश काय उगाच.. हा दरबार नाही तुमचा..

अकबर: खामोश!

जोधाबाई: बिलकुल नहीं खामोश.. जहांपनाह आपका बस नहीं चलेगा अब.. निकाह हो चुका.. वाजवा रे वाजवा पण हो

चुका.. आता आपके हाथ में कुछ नहीं.. सिवा आशीर्वाद देने..

अकबर: खामोश!

जोधाबाई: रागावू नका.. आता काही उपयोग नाही.. ते भुयार वगैरे.. नंतर बघू त्याचे..पण किती रोमॅन्टिक ना..

अकबर: खामोश!

जोधाबाई: दुसरे काही बोलावे जहांपनाह.. एक विचारू.. मला कोणी भिंतीत चिणले असते तर खणले असते का भुयार तुम्ही?

अकबर: खामो.. नक्कीच.. पण आम्ही असताना कोणाची हिंमत तुम्हाला त्रास देण्याची..

जोधाबाई: मग सलीम की रगोंमें पण वोच रक्त बह रहा है.. उगाच रागावू नका.. किती हुश्शार आहे माझा सलीम..

अकबर: हुशार तर आहेच.. आखिर बच्चा किसका है?

जोधाबाई: है ना? हुशार पण आहे ना? आता काही बोलू नका.. नाहीतर बोलाच.. म्हणूनच टाका..

अकबर: काय?

जोधाबाई: आणि काय.. नांदा सौख्यभरे!

# शोले : २

## (मराठी पटकथा)

१

स्थान : रामगड. ठाकूरांचा वाडा. सगळीकडे सामसूम आहे. राधा झोपेतून उठते.. मग एकटीच फिरते आहे.

पाठून गाणे सुरू आहे..

अशी कशी मी एकटी..
झोपते करूनी देहाची वळकटी ..

राधा वाड्यात काही तरी करत फिरतेय. हळूच आपल्या खोलीत येऊन जयचा फोटो पाहते. आपल्या साडीच्या पदराने पुसते. परत ठेऊन देते. समोर ठाकूरांचा फोटो आहे. त्याला नमस्कार करते..

गेले सोडून एक एक
आठवते ते प्रत्येक
मन विचार करीत भरकटी..

एखादा नोकर येतो. त्याला कमरेवर हात ठेऊन काम सांगते. वाड्यातल्या खोल्यांतून फिरत राहते.

हे घर माझे हा एकांती वाडा
हरणावाचून एकाकी पाडा
उभी दिनभर ठेऊन करकटी ..

मग स्वयंपाकखोलीत.. एकटीचे जेवण बनवतेय.. थोडासा भात.. थोडीशी भाजी. हळूहळू बनवतेय.. मग वाढते.. खाते.. भांडी घासायला घेते..

कसलीच न मजला कसली घाई
कुणी न येथे जेवाया येई
नाहीत भांडी फार घासाया खरकटी..

मग रात्र व्हायला येतेय.. राधा बाहेर येऊन दिव्यांची वात कमी जास्त करते.. बाहेर नुसतीच फिरतेय..

लांबून गब्बर पाठीवर वळकटी घेऊन वाड्याजवळ येतोय. अंधारात राधेला तो दिसत नाही. तो झाडाआडून बघतो.. राधा थोडावेळ फिरते.. आत निघून जाते.

गब्बर त्या वाड्याबाहेर झाडाखाली अंग टाकतो.. झोपी जातो ..

पाठून गाणे..

दिन उगवे अन् पुन्हा मावळे
घुबडे उठतील झोपतील कावळे
निद्राधीन जग झाले वाळूनी देहाची मुळकुटी..

राधा आत अंगाचे मुटकुळे करून झोपली आहे.. बाहेर गब्बर हातपाय पसरून घोरत पडला आहे.

२.

सकाळ होते.. राधा उठून कामाला लागते.. एक नोकर धावत आत येतो. घाबरत उभा राहतो..

राधा: मुरली.. आरं, असा कापाया लागला? थरथरतोयास जनू..? हुडहुडी भरली का रं? डेंग्यु की मलेरिया.. का त्यो कोविड तर नाही?

मुरली: न्हाई मालकीण बाय.. त्यापरीस भयंकर.. म्या पाहिलं .. त्याला पाहिलं .. त्यो. . त्यो परत आलाय..

राधा: कोन? कोन परत आलाय?

मुरली: त्यो मालकीणबाय... म्या पाहिलं त्याला. वाड्याबाहेर झोपल्येला तो.. बाय..

राधा: नुसता कापशील की नावपन सांगशील?

मुरली: नाव घ्याया पन भ्या वाटतं..

गब्बर तोवर उठून आत येतो.. त्या दोघांमागे येऊन उभा राहतो..

राधा: दूर दूर गावामदी पोरं घाबरायची तो गब्बर आल्यावानी का बोलतोयस? तो गब्बर आता जेलमध्ये हाये .. चक्की फिरवीत.. आता भ्या कसली..

गब्बर (पाठून) : हाये नव्हं .. होता! म्या आलोय परत! राधाबाई, म्या परतून आलोय..

दोघं चमकून मागे बघतात.

राधा: गब्बर तू.. तुम्ही? हितं आणि आता? जेलमधून सुटून की पळून म्हनावे?

मुरली: बाई.. म्या निघतो बाई ..

मुरली दबकत निघून जातो.

गब्बर : भिऊ नकोस. कारण जो डर गया वो समझो मर गया..

राधा: असं कोन म्हनतं?

गब्बर: म्याच.. पूर्वजल्मीचा..

राधा: पूर्वजल्म? तू.. तुम्ही भूतबित तर नाय ना? पन न्हाई. धा वर्षे जल्मठेप.. फाशी नाय झाली.. भूत बनाया आधी मरावं तरी लागतं..

गब्बर: खरंय राधाबाई खरंय. मेल्यावाचून स्वर्ग दिसत न्हाई .. तसा नरक बी दिसत न्हाई. तसंच हाय हे.. मेल्यावगर भूत बी होता येत न्हाई .. जो डर गया वो समजो मर गया.. पण समजो मर

गया आन् खराखुरा मर गया मदी फरक हाय ना राधाबाई .. पन म्या नवा जल्म घेऊन आलोय. जेलच्या कोठडीने म्या बदललो .. अंतर्बाह्य .. (कपड्यांकडे पाहत) बाह्य न्हाई अजून. पन एकाद्या जंटलमॅन का काय म्हनतात त्या मानसासारखी कापडं शिवून घेईन..

राधाबाई: पण तुमी .. पळून आले? की जेलमधून कुनी सोडले? की सरकारच्या जेलामध्ये जागा उरली न्हाई म्हणून? की कुन्या नेत्याच्या नावाची कैदी सुटका योजना लागू झालीया ..

गब्बर: राधाबाई .. पहिल्या शोलेत तर तुला डायलॉगच नव्हते जास्त.. आता इतकं बदाबदा बोलतेयस.. बसंतीवानी..

राधाबाई: गब्बरभाऊ, संदी .. संदी मिळाली पाह्यजे. आता म्या एकटी.. एकाकी. बोलायला कोण नाही. पन हवं तितकं बोलू शकते म्या.. गब्बरभाऊ..

गब्बर: एक बिनती राधाबाई .. राधा.. तेवढे भाऊ म्हणू नकोस .. म्या सुटलो.. सहीसलामत .. गांधी बाबाची कृपा ..

३.

फ्लॅशबॅक..

डिस्ट्रिक्ट जेल..

सगळे कैदी कामात आहेत. गब्बर फिरत सगळ्यांना मदत करतोय. मध्येच जेलमधल्या शेतातला नांगर खांद्यावर घेतो.. मदर इंडिया स्टाइलने नांगर फिरवत 'जेलमें आए तो काम करनाही पडेगा, बैल नहीं तर शेत नांगरना ही पडेगा' गातो..

पुढे कुणी काथ्या कुटत बसलाय म्हातारा कैदी, गब्बर आपल्या हातांनी मुसळ घेऊन मदत करतो. म्हातारा कैदी कृतज्ञतेने बघतो .. कुणी खुर्ची विणतोय त्याला मदत करतो.. जेलमध्ये झाडू मारतो.. अगदी वरची कोळिष्टके लांब झाडू घेऊन काढतो.. कैद्यांची भांडणे सुरू आहेत.. ती सोडवायला जातो..

गब्बर: बापूंनी सांगितले ते लक्षात ठेवा. भांडण म्हणजे आपल्याच शक्तीचा नाश. आत्मोन्नतीचा मार्ग आत्मक्लेषातून जातो.. तुम्ही भांडण करू नये म्हणून मीच आता उपोषण करायला बसणार आहे.. एवढे गब्बर की पहली पसंद पार्ले जी बिस्किट खाऊन बसतो ..

गब्बर बिस्किट खाऊ लागतो..

कैदी १: नहीं सरदार. आमच्यासाठी तुम्ही उपोषण करणार?

कैदी २: नहीं सरदार नहीं. यह नहीं हो सकता..

कैदी ३: क्या नहीं हो सकता?

कैदी २: आपण सारे असताना सरदार पार्ले जी कसे संपवू शकतात? आम्हालाही हवेय.. पार्ले जी.. गब्बर की पहली पसंद.. वो हीच हमारी पण पसंद..

गब्बर : खामोश.. तुम्हें क्या लगता है? सरदार साबासी देगा.. पहले भांडण खत्म करो.. बोला.. हम सब कैदी भाई भाई..

कैदी १: जो हुक्म सरदार.. हम सब कैदी भाई भाई.. बाकी कशाची आम्हाला घाई?

समोरचे कैदी निघून जातात. जेलर आत येतो.

जेलर: गब्बर, तुझ्यामुळे सारे कैदी लहान मुलांसारखे राहू लागले .. दोन वर्षांपूर्वीचा गब्बर आणि हा गब्बर .. ओळखू येत नाहीत दोघे.. तुम्हारे इस बदलाव का राज क्या है गब्बर? ये राज.. ये राज मुझे बता दे गब्बर..

गब्बर: हुजूर .. इस नाचीज का क्या.. हा सगळा गांधीजींच्या पुस्तकांचा परिणाम आहे. डोक्यावर चांगलाच परिणाम झालाय.. आपल्या लायब्ररीतली पुस्तके वाचून वाचून बदललोय मी..

जेलर: अशा वेगाने बदललास तर तो दिवस दूर नाही जेव्हा तुझी शिक्षा माफ होईल.. आणि तू परत आपल्या घरी परतशील..

गब्बर: हां. ह्या आयुष्यात आता सुटकेचे दोन मार्ग आहेत.. गांधीजींच्या मार्गानेच.. एकतर सगळ्यांना मदत करायची.. खरोखर बदलाव .. नाहीतर सुटका करून घ्यायची.. नि नेता बनून राजनीती करायची.. गांधीजींच्याच नावाने .. म्हणजे थोडेफार पूर्वायुष्यासारखे पण राजसंमत..

जेलर: तसे झाले तर तो दिवस ही दूर नाही जेव्हा हा जेलर सलाम ठोकेल .. एका कैद्याला..

गब्बर: कल किसने देखा है जेलरजी.. ह्या भविष्याच्या पोटात काय दडलेय ते न आम्हास ठाऊक न तुम्हाला ..

जेलर: पण लवकरच गब्बर तुझी सुटका होणार ..

जेलमध्येच समारंभ आहे..

कैदी आहेत, समोर गब्बर आहे.. खुर्चीवर बसलेला.. जेलर भाषण ठोकतोय..

जेलर: आज ह्या जेलच्या इतिहासला एक सुवर्ण अक्षरांनी लिहावा असा दिवस आहे.. आपले प्रिय कैदी नंबर चारशेवीस श्रीयुत गब्बरसिंग आज जेलमधून सुटत आहेत. गांधी वचनांचा

अभ्यास करून त्यांनी स्वतःत आमूलाग्र बदल घडवला आहे. दोन ऑक्टोबरच्या गांधी विचार परीक्षेत गेले तीन वर्ष सतत पहिल्या क्रमांकाने श्री. गब्बर सिंग उत्तीर्ण झाले आहेत. त्यामुळे शासन आदेशानुसार त्यांची सुटका होत आहे. माझी खात्री आहे, लवकरच श्री. गब्बर सिंग एक मान्यवर नेता म्हणून जाणले जाऊ लागतील. आमची ही विनंती आहे, सुटल्यानंतर आम्हाला विसरू नये.. आपल्या कृपेचा वरदहस्त आमच्यावर सतत ठेवावा..

कैदी: देस का नेता कैसा हो.. गब्बर सिंग जैसा हो..

गब्बर माइक समोर उभा राहून भाषण करतोय.. जेलर त्याला हार घालतो.. तुरूंगात एखाद्या सणासारखे वातावरण आहे.. सगळे आनंदात आहेत. एकेका कैद्याला भेटून गब्बर तुरूंगातून बाहेर पडतो..

गब्बर: भाईयों.. जेल एक ऐसी जगह है.. वहां यह तो नहीं कह सकते.. जल्दी लौट आना.. फिर मिलेंगे..

फ्लॅशबॅक समाप्त..

४.

गब्बर: हे समदं असं झालं बघ राधाबाई. मी जेलमध्ये पुरता बदललो. खूनखराबा समदा बंद. बंद मंजी एकदम बंद. आता फक्त अहिंसा. हा माझा समजा दुसरा जल्म हाये .. म्हणून सर्वात पहिल्यांदा ठाकूरसाहेबाना भेटायला आलो.. ठाकूर हायेत ना?

राधा: भेटायचे? आत या..

राधा गब्बरला चंदनाचा हार घातलेल्या तसबिरी समोर नेऊन उभी करते..

गब्बर: कदी? कदी गेले?

राधा: होत येईल एक वरिस आता. डेंग्यू मच्छर चावला.. नि काला मलेरिया झाला.. त्यातच ठाकूर गेले.. म्या एकटी हाये इथे.. कधी जय ची आटवण.. कधी कसली आटवण काढून जगतेय.. गब्बरभाई..

गब्बर: एक बिनती, तितके भाई म्हनू नका.. राधा.. बाई ..

राधा: आलात तसे जेवून जा..

गब्बर: जा? अं.. हो.. जेवून.. जा.. जातो.. त्या जुन्या गुहेचे काय झालं असंल.. साडेतीन वरसं झाली.. त्यात काय काय नाय बदलले..

बोलता बोलता तसबिरीखालील चपलांकडे नजर जाते. तेच खिळे ठोकलेले पायताण, एक क्षण जुना सीन डोळ्यांसमोर येतो .. पण एक नजर टाकून गब्बर पुढे होतो..

गब्बर: थोडी अंघोळ करून घेतो. दातबित घासून चहा पितो.. दुपारच्याला जेवतो..

राधा: ठीक.. कोंबडी कापून घेते..

गब्बर: वा! गब्बर की पहली पसंद.. फकस्त मान मुरगुळू नका कोंबडीची. हलकेच चिरा.. म्या हळूहळू शाकाहारी होत चाललोय.. म्हणून हिरवा रस्सा बनवा .. खाताना घासफूस खाल्ल्याचा भास झाला की बस..

राधा: हिरवा रस्सा .. ठाकूरना खूप आवडायचा.. गेले बिचारे काला मलेरिया होऊन.. त्यो चावलेला मच्छर.. दुसऱ्या दिवशी त्याची डेडबाॅडी सापडली.. मच्छराची आत्महत्या.. ठाकूरसारख्यांना चावल्याचे प्रायश्चित .. आणि काय..

गब्बर: खरंय.. मच्छर अमर रहे.. नहीं नहीं.. ठाकूर अमर रहे..

गब्बर वाड्यामागच्या विहिरीवर अंघोळ करतो..दातून घेऊन दातबित घासतो.. ठाकूरचा शर्ट घालून परत येतो वाड्यात..

५.

भरल्या ताटासमोर पाटावर बसून गब्बर हिरवी कोंबडी चापतोय. अवतार बदलून एकदम सभ्य माणसासारखा. ठाकूरचा शर्ट घालून बसलेला. राधा स्वतः वाढतेय ..

राधा: भाकर अजून वाढू?

गब्बर: किती दिसांनी जेवतोय असं. नायतर सगळेच निचव .. जेलात आपनच शिजवा आपनच खा.. त्ये पाहूनच म्या ठरिवलं.. बदलायचं..

राधा: आज ठाकूर असते तर ..

गब्बर: गेला मानूस परत येत नाय राधाबाई. आधीच्या आयुष्यात कितीकांना पाटवले वरती त्याची गणती नाय .. पण हा गब्बर आता आतून आन (कपड्यांकडे पाहात) भायेरूनही बदलला.. सत्य आन् अहिंसा..

राधा: विलेक्शनला उभे राहनार की काय?

गब्बर: तुम्हाला काय वाटतं राधाबाई? तुम्ही म्हनाल तसं करतो..

राधा: इश्श.. मला काय वाटायचे त्यात. इतक्या वरिसांनी डाकू गब्बर डाकिया बनून उबा राह्यला समोर .. त्याने आजका एम एल ए बनावं की न बनावं, हे म्यां काय सांगनार .. पण खरेच बदलला आसंल स्वभाव तर ..

गब्बर: खरंय राधाबाई. म्या जेलरसाहेबांना ह्येच सांगितलं .. पूर्वीचा धंदा सोडला म्या .. तव्हा आमदार खासदार बनने शक्य नाही. जंटलमन होन्याचा निश्चय करून आलोय.. फकस्त ह्ये कपडे बदलण्यासाठी नाय .. ह्या ठाकूरांच्या शर्टाच्या बाह्यांना कित्येक वर्सात काम नव्हते .. आता मिळाले ..

राधा: जेवन आवडले गब्बर सिंग?

गब्बर: राधाबाई .. खरं सांगू .. जेवन आवडलं.. त्याहूनही जेवन बनवणारी आवडली. माझं ह्ये असं हाय बग .. राधा.. आढेवेढे नाहीत. मी येकटा.. तू येकटीच. मी सभ्य गृहस्थ .. आपण लगीन करू.. संसार थाटू. नायतरी तुला कोन आहे आता नि मला कोन ..

राधा: वाढू अजून .. चिकन? तंगडी हाये ..

गब्बर: आज साडेतीन वर्सानंतर जेवतोय.. दे.. तंगडी दे.. पण म्या काय इचारले त्याचं उत्तर पन दे..

राधा: शांत जेवा गब्बरसिंग..

गब्बर: ठाकूरकडे ये हाथ मुझे दे दे म्हणणारा गब्बर आता राधेकडे हात मागतोय .. ये हाथ मुझे दे दे राधे.. जिंदगीभर के लिए.

राधा: तुमचे कायतरीच. समुद्रात चालनारी कुठंबी जानारी माझी जीवनाची होडी.. कुठं पोचेल नेम न्हाई ..

गब्बर: तेच.. राधे त्येच.. तुज्या होडीचा मी वल्हवणारा नाखवा होईन.. होडीत जाऊ जोडीनं नि राहिलेल्या आयुष्यात सुखाची मासेमारी करू.. तू फकस्त हो म्हण ..

राधा: हात धुवून घ्या.. बडीशेप देऊ?

गब्बर: राधे.. म्या आता बदललो.. हात धुवेन पण हात धुवून मागं नाय लागणार .. तू इचार कर.. वेळ घे तुझा.. पण म्या तुझ्या हातच्च्या कोंबड्या जल्मभर खायला तयार हाये .. दोन येकट्यांनी एकमेकांना साथ देण्यात चूक ती काय? राधे तू आनंदात असशील तर जयचा आत्मा पन तिकडं शांत होईल .. आन् थोडं माझं पाप पन धून निगंल..

राधा: बडीशेप?

गब्बर: दे दे.. इचार कर.. आन् फकस्त हो म्हन .. बारात लेकर आऊंगा.. वरात कसली.. मी येकटाच.. तू बी येकटीच .. चट मंगनी पट ब्याह ..

राधा: हटा.. जा आता.. उंद्याच्याला या जेवायला.. बोकड कापू..

गब्बर: का .. काय हाॅटेल उघडतेयस?

राधा: हं.. इचार करतेय.. राधा दा धाबा उघडते.. येक गिऱ्हाइक तर फिक्स आहे..

६.

गब्बर रोज जेवायला येतो.. रोज कोंबडी नाहीतर बकरी कापली जातेय.. राधा स्वतः स्वयंपाक बनवतेय.. बडीशेप चघळत चघळत गब्बर परत जातो.. आता ठाकूरचेच कपडे घालून फिरतोय गब्बर .. राधा इकडे विचारात पडतेय.. पूर्ण आयुष्य पडलेय समोर .. पाठून तेच गाण्याचे स्वर ऐकू येतात ..

गेले सोडून एक एक
आठवते ते प्रत्येक
मन विचार करीत भरकटी..
अशी कशी मी एकटी..

एक दिवस राधा मानतेच..

राधा: आज मटन आवडलेलं दिसत न्हाई. नळी नाहीत चोखली ती..

गब्बर: राधे, तुझ्या इचाराने म्या आता थकून गेलोय.. रोज तू खाऊ घालतेस.. गाववाले बी बोलाया लागलेत काहीबाही .. ह्ये खानावळ मालकीणीचे नाते सोड..

राधा: तुम सिर्फ शरीरके मोटे हो गब्बर .. अक्ल के दुष्मन.. तुमाला एवढं कळत न्हाई .. म्या काय खरेच खानावळ चालवते की

काय..? दुसऱ्या दिवशी परत जेवायला बोलावलं त्याचा अर्थ काय?

गब्बर: राधे, ते तर बोकडाचे मटन बाकी व्हतं म्हणून .. नाय म्हणजे .. तू मिसेस गब्बर ..

राधा: हां.. गबराईन..

गब्बर: हां.. गबराईन..

पाठून गाणे..

विधात्याची करणी कुणा कळली कधी
नियतीचा फुल्लटॉस कधी
कधी पडला असा सरपटी ..
नाही नाही नाही मी एकटी ..

राधा ठाकूरच्या तसबिरीसमोर उभी राहून आशीर्वाद घेते.. मग जयची तसबीर हातात घेऊन नीट पुसून एक बॅग उघडून तिच्या तळाशी ठेऊन देते ..

डाव मांडला नवा नवा
जो वाटे आता हवा हवा
हाय दैवा पडू दे आता बरोबर सोंगटी
नाही नाही नाही मी एकटी..

७.

गब्बर राधेच्या वाड्यात रहायला आलाय. राधा आता पांढऱ्या साड्या सोडून रंगीत साड्या घालतेय.. रोज सकाळी गब्बर उठतो.. राधा त्याला मोठ्या कपात चहा बनवून देते.. गब्बर जवळच्या शेतात जायला निघतो. शेत नांगरतो.. बैलांना चाराबिरा घालतो..

पाठून गाणे :

गब्बर:

गेले दिवस सगळे
सरले आयुष्य सरले
चिकन मटणच्या आशेवर
सरेल जे आहे उरले..
ही गबराईन ..
ही गबराईन ..

राधा:

गेलेल्यांच्या आठवणीने
डोळे पाणावून येती
दैवाची करामत की
जुळून येती नवी नाती ..
मी गबराईन..

मी गबराईन..

राधेच्या हातात बाळ आहे.. गब्बर मोठ्या प्रेमाने पाहतोय. पाळण्यात बाळाला झोपवत राधा दोरीने झोका देतेय .. गब्बर बाळाला हवेत उडवत कॅच कॅच खेळतोय..

राधा:

कधी न केला विचार कसला
दिवस असा दिसेल असला
बाळ तान्हा सानुला गबरू
आज असा का रूसला ..
मी त्याला मनवून येईन..
मी गबराईन
मी गबराईन..

हळूहळू मुलगा मोठा होत जातो.. शाळेत.. नि मग कॉलेजात जाण्याच्या वयाचा होतो.. फटफटीवर टांग टाकून भुर्रकन टाटा करत जातो..

गब्बर:

नाव काढेल मोठा होईल
पोर गब्बरचा गबरू होईल

हुशार मोठा आहे राजा
खेळेल नातू पणतू होईल
म्हणेल जग मग व्हेरी फाईन
ही गबराईन
ही गबराईन..

मुलगा त्याच्या बाईकवर स्वार कॉलेजात पोहोचतो.. पाठी एक कॉलेजकन्यका येऊन बसते.. दोघे बाईकवरून दूर नदीच्या काठी येऊन बसतात..

८.

घरी अभ्यासाची पुस्तके उघडून विकास बसला आहे. विकास म्हणजे राधा-गब्बरचा मुलगा. मध्येच पुस्तकातला फोटो पाहतो.. स्वप्न पाहिल्यासारखा बसून राहतो. राधा हळूच सगळे पाहत आहे..

राधा: विकास, काय सुरू हाय बाबा? कसला येवढा इचार करतोस..

विकास: काही नाही आई, परीक्षा आहे ना..

राधा: परीक्षा हाय तर अभ्यास कर.. इचार करून काय उपेग? आन् इचारच करायचा तर कशाचा तरी कर बाबा.. कुनाचा तरी करून परीक्षेत काय फायदा..

विकास: अगं, परीक्षा जवळ आलीय..

राधा: त्येच सांगतीया म्या.. त्यो फोटो पाहून अभ्यास व्हतो व्हय रं? कुनाचा हाये? पाहू तर..

विकास लाजतो.. पण राधेने त्याला पकडलेय एकदम. त्यात आढेवेढे घ्यायला आता जागा नाही ..

फोटो काढून दाखवतो..

राधा: गोड हाय रं.. कुटं भेटली?

विकास: कॉलेजात आहे.. सेकंड इयर..

राधा: का कुणास ठाऊक.. कुटंतरी पाह्यल्यावानी वाटते..

विकास: हुशार आहे..

राधा: कोन? म्यां?

विकास: अन् गाते पण चांगली ..

राधा: म्यां?

विकास: आई..

राधा: आरं, डायरेक गुणगान सुरू केलंस .. अवो, ऐकतात का..

विकास: आई, पपांना नंतर सांग..

राधा: नंतर का? न्हाई म्हंजे तुजं नक्की न्हाई म्हनून की..

विकास: तसं नाही गं.. पपांचं ठाऊक आहे ना.. उद्या बोलावून घेतील. त्यांचं सगळं काम झटपट..

राधा: मंग? अजून इचार बाकी हाय? तिचा की तुजा?

विकास: हे काय आई? अगं परीक्षा होऊन जाऊ देत..

राधा: म्हंजे तोवर फोटोवर काम चालवनार म्हन की.. पन नाव तर सांगशील का न्हाई?

विकास: गिरिजा ..

राधा: गोड हाये..

९.

नदीकिनारी विकास आणि गिरिजा बसलेत..

विकास: यू नो गिरी, काल आईने पाहिलेय.. तुझा फोटोच हाती लागला .. तिच्या ..

गिरिजा: मग काय?

विकास: आई म्हणते, तुला कुठेतरी पाहिलंय .. पण ते कसं शक्य आहे? आई गावातून बाहेर जात नाही नि तू तर कधी गावात आली नाहीस..

गिरिजा: स्वप्नात पाहिले असणार .. आजकाल सासूबाई लोकांना सुना येतात म्हणे स्वप्नात ..

विकास: खरंच.. सासूके सपनोंकी रानी कब आयेगी तू.. आई ऋत मस्तानी कब आएगी तू.. चली आ तू चली आ..

गिरिजा: मी तर येईन.. स्वप्नात नि सत्यातही.. पण आपल्या घरचे मानतील की नाही? टेन्शन .. माझी आई तर रामगडकडे ढुंकूनही नाही पाहात. म्हणते आयुष्यात दूर कुठेही जाईन पार सातासमुद्रा पलीकडल्या देशातही.. पण रामगडला नाही .. विचारले तर काही बोलत नाही .. आणि बाबा तर म्हणतात एकदा तरी रामगडला जायचेय.. दोघे दोन दिशांना ..

विकास: हुं.. आणि माझे पपा.. ते तर जेलमधून सुटून आलेत.. तुझ्या घरी माहिती पडले तर..

गिरिजा: कम्बख्ती..

विकास: माझे आजोबा पोलिस ऑफिसर होते.. मागे कुठल्या डाकूंवरच्या हल्ल्यात त्यांचे दोन्ही हातच कापून टाकलेले कुणीतरी .. आणि पप्पा.. मागे डाकूगिरी करायचे.. वीस वर्षे झाली सुटून .. पण आता एकदम सद्गृहस्थ.. कोणाला वाटणार नाही एकेकाळी तसे होते. पण तुझ्या घरच्यांना पटले नाही तर?

गिरिजा: टेन्शन .. परीक्षा सोपी त्याहून ..

विकास: टेन्शन नाॅट डिअर.. आई आहे माझी ती करेल मॅनेज ..

गिरिजा: पण समोरासमोर आले तर ना.. आई माझी रामगडला यायला तयार नाही .. तर तुझ्या आईची भेट होणार कशी?

विकास: वरी नाॅट गिरि ..

गिरिजा: गिरी नकोस म्हणू रे.. मी काय डोंगरासारखी आहे?

विकास: नाही गं.. तू शेवग्याची शेंग

गिरिजा: शेवग्याची?

विकास: नाहीतर गवारीची..

गिरिजा: गवारीची?

विकास: नाहीतर चवळीची शेंग.. हिराॅईन तू..

गिरिजा: उगाच हरभऱ्याच्या झाडावर चढवू नकोस..

विकास: तसं नाही गं.. खरंय हे.. तुला हिरॉईन म्हटले की मी आपोआपच हीरो होतो.. म्हणून ..

गिरिजा: असं कोण म्हणालं?

विकास: कोणी म्हणायची गरज नाही .. मी स्वावलंबी आहे या बाबतीत ..

गिरिजा: विकास सगळे ठीक होईल ना? माझी आई म्हणते, अब्रू महत्त्वाची .. अब्रू कोंबडीच्या अंड्यासारखी असते म्हणते ती. एकदा टिचली गेली की परत जोडता येत नाही .. त्यामुळे तुझ्या पपांची पास्ट हिस्टरी..

विकास: वा! कोंबडीचं अंडं.. वरी नॉट डिअर.. अंडं टिचलं तर उकडता येत नाही .. पण आमलेट तर बनवू शकतो की नाही..?

गिरिजा: तू किती हुशार आहेस रे..

विकास: तुझ्या इतका नाही .. तूच खरी हुशार .. तुझा चॉइस माझ्याहून चांगला आहे..

गिरिजा: आहेच मुळी.. (एकाएकी लक्षात येत) क्काय म्हणालास.. तू.. मी निघते ..

उठून चालू लागते..

विकास: सॉरी .. तुला हुशार म्हणून चूक झाली..

गिरिजा फणकाऱ्यात जायला लागते.. जवळची रानफुले तोडून विकास तिच्या मागे..

१०.

घोडागाडीतून गब्बर आणि राधा निघालेत. पुढे बाईकवर विकास ..

राधा: अवो, पोरगी चांगली वाटतेय.. मुख्य म्हंजे विकासला पसंद हाये..

गब्बर: जमाना किती बदल्ला राधे.. नाय? आपल्या जवानीत नुसता खूनखराबा.. आताची पोरं पाह्यली की बरं वाटतय.. पन पोरीचे मायबाप आपल्या गावी नाय आले..

राधा: अवो, समदा हिसाब एकच.. आपल्याला कुटं चालत जायचंय.. घोडं तर दामटायचं पुढं..

गब्बर: अन् राधे, त्यात तू हुशार हायेस..

राधा: कायतरी तुमचं.. पन म्या सांगते .. पोरगी कुटंतरी बघितल्यावानी वाटते.. तुमी पाह्यला न्हाई फोटो..

गब्बर: फोटो कशाला? आता जाऊ तर प्रतेक्ष पाहू..

राधा: ते बी खरंच.. हातच्या काकणाला आरसा कशाला .. खरं की न्हाई?

गब्बर: राधे, आजपरेंत तू खरं नाय असं काय बोललीस काय? म्या तर आइकलं नाय .. सत्य अन् अहिंसा ..

राधा: अवो, काय विलेक्शनला उबं ऱ्हातात की काय?

गब्बर: तुला बावीस वर्स झाली सांगून .. म्या एकदम जंटलमन .. विलेक्शन नाय नि काय नाय.. शेती करायची अन् घरला ऱ्हायचे..

राधा: म्या कधी काय बोल्ली? अजून किती लांब रं सासुरवाडी विकास ..

गब्बर: त्याला काय आयकू जाते का? तुला गावाभायेर जायची सवै नाय.. घोडागाडीत किती दिसांत बसली नाय तू.. पन् एक घोडा घ्यून टाकू.. तुला रोज रपेट मारून आणल..

राधा: म्या आन् घोड्यावर?

गब्बर: तू कशाला .. म्या हाय ना.. माझ्या पुढं तू.. डबल सीट..

राधा: त्येच बाकी ऱ्हायलं म्हना.. पोराच्या लगीनाची बात करायला चालले नि तुम्हाला गावभर फिरायचं.. बायकोला पुढं घेऊन..

गब्बर: तर गं.. लगिनाची हाय.. घाबरतो का काय सरदार..

राधा: सरदारकीची हाऊस अजून बाकी हाय म्हना की ..

गब्बर: आगं गबराईन .. कसली सरदारकी अन.. कसलं काय..

विकास मागे वळून ..

विकास: डावीकडे गाडीवान..

राधा: अजून किती रं दूर..

विलास: आलंच.. ही नदी ओलांडली की..

विलास पुढे निघून जातो..

राधा: गाव मोठं दिस्तंय.. मोठ्या गावची पोर.. बरी आसंल स्वभावाला तर.. नायतर नुसताच नट्टापट्टा अन् कामाला बट्टा ..

गब्बर: तू हायस ना.. शिकवून टाक..

राधा: पोरीच्या घरचे काय करतात वो? विकासला इचारलं तर म्हणे जाऊन प्हा..

गब्बर: खरंय त्येच.. जायचंच हाय तर आगाऊ म्हायती कशाला .. पण तिच्या बापाचं वीरकुमार नाव कुटंतरी आइकल्यावानी वाटतंय ..

राधा: तर वो.. पोरगी बी बघितल्यावानी वाटतीया.. माझी नजर चुकाची न्हाई ..

गब्बर: त्ये बरीक खरं.. बावीस वर्सं झाली.. म्या घरी आलेला.. एका नजरेनं घायाळ..

राधा: गपा.. गुमान बसा. वय काय अन् बोल्ता काय.. गाडीवाला आइकेल त्याचं तरी काय..

गब्बर: घाबरतो की काय.. जो डर गया वो समझो मर गया..

विकास थांबून इशारा करतो. घोडागाडी थांबते. समोर एक वाडा आहे.. घोडागाडीतून दोघे उतरतात.

गब्बर: राधे तू विकासबरोबर हो पुढं.. मी आलो या गाडीवानाला जागा दाखवून ..

विकास: चल आई..

वाड्याच्या उघड्या दरवाजातून विकास आणि राधा शिरतात.. राधा समोर पाहते..

राधा: बसंती .. तू?

बसंती: राधे तू?

विकास आणि गिरिजा एकमेकांकडे आश्चर्याने पाहातात ..

राधा: तरीच चेहरामोहरा ओळखीचा वाटत व्हता पोरीचा .. बसंती .. किती वरीसांनंतर..

बसंती: हा विकास तुझा मुलगा ..?

एकाएकी काही लक्षात येऊन राधा अस्वस्थ होते..

बसंती: काय झाले राधे? गिरिजा .. जा बाबांना बोलावून आण..

गिरिजा जाते..

राधा अस्वस्थ उभी राहते..

बसंती: बस की राधे.. आणि तू पण विकास ..

राधा आणि विकास बसतात.

बसंती: ह्याचे वडील नाही आले?

विकास: येताहेत पप्पा .. घोडागाडीची व्यवस्था लावून ..

गिरिजा आणि वीरू आत शिरतात..

राधेला पाहून ..

वीरू: राधावहिनी .. तू?

वाड्याच्या दरवाज्यातून गब्बर आत शिरतो..

गब्बर: येऊ का आत..?

वीरू: कोण.. गब्बर तू? इथे?

विकास: माझे पप्पा आहेत ते..

वीरू: राधावहिनी ..

गब्बर: हो म्याच.. वीरू.. तू? आन् बसंती? तू? तुमची पोर? ही?

वीरू: आणि तुझा पोरगा.. हा? तुला शोधून हाच सापडला अख्ख्या शहरात.. गिरिजे ..

बसंती: म्हणून मी म्हणत होते.. रामगडाचे तोंड नाही पाहणार .. पण तुम्ही .. रामगडचे लोक झाले म्हणून काय झाले.. म्हणे.. मला उगाच बोलायची सवय तर नाही .. पण हे म्हणजे असं झालं.. घरचे झाले थोडे अन् व्याह्याने धाडले घोडे..

गब्बर: वीरू.. इसर तो भूतकाळ.. ह्या पोरांचा भविष्यकाळ बघ..

वीरू: काळ.. बघतो.. आमच्या जिवाचा काळ.. पंचवीस वर्ष झाली.. जयला जाऊन.. राधावहिनी .. तोच गब्बर .. हा धक्का जब्बर ..

गब्बर: हो हीच राधा माझी गबराईन ..
बसंती: उगाच तोंड उघडायला लावू नका.. राधे..
वीरू: गिरिजे .. हे काय केलंस तू..

पाठून गाणे

इकडे आणिक तिकडे जणू धगधगते सगळी आग
कसे म्हणावे कुणी कुणाला चल कामाला लाग..

भेटती दोन जणे अन दोन मने ओंडके जणू
वैरी असती ते घरवाले.. काय तयाला म्हणू?

काय वाढले नियतीने हे पुढे असले ताट..
गादी देई उशी ही देई पण नाही झोपण्या खाट..

११.

तोच नदीतीर .. पण एका दगडाच्या आडोशाला कुणाला दिसणार नाही असे बसलेले विकास आणि गिरिजा..

गिरिजा: आता रे काय?

विकास: मी तरी काय सांगू? एकेक गोष्ट अशी कॉम्प्लिकेटेड आहे.. आजोबांचे हात छाटणारे माझेच पप्पा.. आणि तुझे बाबा तेव्हा त्यांचीच सुपारी घेऊन आलेले.. ठाकूरांनी माझ्या पप्पांना मारले त्या चपला अजून जपून ठेवल्यात घरी..

गिरिजा: आणि या सगळ्यात माझी आई टांगेवाली.. जय काका तुझ्या पपांशी फाइटमध्ये गेले.. आणि तू त्यांचा मुलगा.. आईशपथ.. असला प्लाॅट तर हिंदी सिनेमात पण नसेल.. आपण तो ओडियन मध्ये पाहिलेला साऊथ इंडियन सिनेमा आठवतो..

विकास: मला नाही आठवत.. मी कुठे तो सिनेमा बघत होतो?

गिरिजा: प्रसंग काय आणि चावटपणा सुचतोय तुला ..

विकास: सत्य गोष्टीत चावटपणा कसला?

गिरिजा: चूप रे.. आता पुढे काय?

विकास: एक सुचतेय सांगू..?

गिरिजा: खरेखुरे काही असेल तर सांग..

विकास: रामगड नि तुझे गाव लक्ष्मणपुर .. दोन्हीकडे हाॅस्पिटलात तुझे नि माझे पप्पा ॲडमिट आहेत.. डाॅक्टर ऑपरेशन करतात .. दोघांची हृदये बदलून टाकून एकमेकांना बसवतात .. दोघे उठून बसतात .. हृदयपरिवर्तन होऊन.. आणि आपल्या लग्नाला संमती देऊन टाकतात..

गिरिजा: वाटलंच मला .. खरेखुरे सोल्यूशन काढशील तर तो तू कसला .. मला तर टेन्शनचे ही टेन्शन आलंय विकास ..

विकास: मला पण.. माझ्याकडून इतका प्रॉब्लेम नाही जितका तुझ्या घरून.. खरेतर गोष्टीप्रमाणे माय डॅड वाॅज मोअर डेंजरस दॅन युवर्स..

गिरिजा: काहीतरीच.. म्हणून त्यांना पकडायला माझ्या बाबांना बोलावलेले.. तेही तुझ्या आजोबांनी?

माय डॅड वाॅज मोअर खतरनाक..

विकास: भला इसके डॅडी मेरे डॅडीसे खतरनाक कैसे? अशी एखादी जाहिरात यायची.. आता आगे आगे देखिए होता है क्या.. गालिब म्हणून गेलाय .. यह इश्क नहीं आसाँ.. इतना तो समझ लीजे.. एक आग का दरिया है और डूबते जाना है..

गिरिजा: मी तर बुडणारच..

विकास: आणि मी पण.. अल्ला दे कुछ सल्ला .. काय करावे .. तू मनव तुझ्या बाबांना काहीतरी सांगून .. हृदयपरिवर्तनाची उदाहरणे दे.. नाहीतर काहीतरी शोध आयडिया..

गिरिजा: हुं.. जसे काय तुझे पप्पा मानणारेत..

विकास: ते आई पाहून घेईल..

गिरिजा: काय होणार रे?

विकास: शोले.. आगीच्या ज्वाला सगळीकडे.. तुझ्या न माझ्यात प्रेमाचे शोले.. आणि आपल्या घरच्यांत .. दुष्मनीचे शोले.. गालिब पण आग का दर्याच म्हणून गेलाय..

गिरिजा: काहीतरी चांगले बोल ना रे..

विकास: अगं चांगलेच बोललो नाही का .. पहिला अर्धा भाग.. प्रेमाचे शोले वाला..

गिरिजा: हट् .. चावट.. कशीबशी मी घरातून निसटून आलेय.. आता भेटणे पण कठीण ..

विकास: आयडिया.. तुला पळवून नेऊ? घोड्यावरून..

गिरिजा: घोड्याच्या टापांचा आवाज येईल तर?

विकास: ते खरंच.. जुन्या काळी हे कठीण होतं नाही कां? घोडा कितीही रोमँटिक वाटला ना तरी बाईकच बरी..

गिरिजा: खरंय..

विकास: म्हणजे पळवून नेऊ तुला.. गिरिजा बाई ला बाईक वरून..

गिरिजा: छे! बाई आणि बाईक काय? बावळट..  गिरिजाबाई म्हणे? आणि थांब रे.. तो शेवटचा उपाय .. काहीतरी शोधू उपाय .. नाहीतर मीच पळवून नेईन तुला .. इक्वॅलिटी म्हणून काही असते की नाही?

विकास: अगं सिनेमा असता हा तर गाणेबिणे गायले असते.. नशीबाच्या दोरापुढे चाले उपाय कसला ..

काय करावे त्याचे जेव्हा घोडाच बसला..

गिरिजा: नशीबाचा दोर? हा कुठला नवीन?

विकास: अगं ज्याच्या हाती नशीबाची दोरी.. तो जगाते उद्धारी..

गिरिजा: तू उगाच फालतू बोलू नकोस. इकडे टेन्शन नी हालत झालीय..

विकास: डोकं दुखतंय.. सर्दी .. सरदर्द ..

गिरिजा: हां बाबा हां..

विकास: मग कुछ लेते क्यूं नहीं?

गिरिजा: चूप रे.. आता पुढे काय रे? एक महिन्यात कॉलेज पण संपेल.. मग तर बाहेर पडणेही कठीण .. एक महिना बाकी आहे.. त्यात उपाय..

विकास: अवर टाइम स्टार्ट्स नाऊ..

१२.

घोड्यांच्या टापांचा आवाज.. गब्बर एकटाच निघाला आहे. पहाटेची वेळ. खांद्यावर बंदूक. एकटाच आहे.. वीरूच्या गावाकडे चाललाय. नदीवरचा पूल ओलांडून गावात शिरतो.. मग वीरूच्या वाड्यात ..

गब्बर बंदूक रोखून पुढे शिरतो..

वीरू: गब्बर .. परत आलास.. कुत्ते .. कमीने ..

गब्बर: वीरू.. गिरिजा मुझे दे दे वीरू..

वीरू: नय..

गब्बर (बंदूक रोखत): हाय कुनी माईचा लाल जो आडवेल मला.. म्या तुज्या पोरीला घ्यून जानार.. उगा अडेलतट्टूपना करू नगं..

वीरू: बसंती, मेरी बंदूक लाना..

बसंती आतून बाहेर येते ..

बसंती: बंदूक? इतकी वर्षे वापरली नाही तिला गंज चढला असेल..

वीरू: चालेल.. मागच्या वेळी अर्धवट राहिलेले काम संपवतो.. ठाकूरनी मारू दिलं नव्हतं.. आता सोडणार नाही. गब्बर तयार हो.. मी आलोय..

वीरू आणि गब्बर दोघांचा गोळीबार सुरू होतो.. वाड्यात बसंती लपून बघतेय.. एका गोळीने वीरू ठार होतो.. गब्बर गिरिजाला पकडून घोड्यावरून परत निघतो ..

गिरिजा: हे काय केलंत.. माझे बाबा .. त्यांना मारून टाकलंत .. तुम्हाला काय वाटलं, बाबांना मारणाऱ्याच्या घरी मी सून म्हणून जाईन..

चालत्या घोड्यावरून उडी मारून ती घराकडे धावत सुटते..

गब्बर: नय..

एकाएकी स्वप्नातून जागा होत ओरडतो.

राधा: काय वो? काय झालं? सपान पडलं?

गब्बर: काय नाय.. नीज तू..

गब्बर उठून येरझाऱ्या घालतोय.. मनात विचार..

इतकी वर्स झाली पन मनातला डाकू काय मरत नाय.. बंदुकीच्या जोरावर कुनी लगीन लावतं .. पन त्यो वीरू असा अडून बसला.. काय करावं त्याचं..

१३.

वीरू राहतो त्या लक्ष्मणपुर गावची सीमा. समोर नदी आहे. मोठ्या डोंगराच्या पायथ्याशी गाव..

गब्बर घोड्यावरून उतरतो. तिकडून वीरू येतो..

गब्बर: ये वीरू..

वीरू: कुत्ते कमीने .. मी तुझं रक्त पिईन ..

गब्बर: वीरू, घुस्सा सोड.. रगत बिगत पिईन काय .. हिंदीत ठीक डायलाॅग.. तो काय मिलक शेक हाय की फ्रूट ज्यूस? की थम्सप? लई वरसं झाली भेटून.. अजून पावेतो तू तेच घ्यून बसला ..

वीरू: माझ्या मित्राला मारणारा तू.. तुला पाहून रक्त उसळते..

गब्बर: उसळू दे.. थोडायेळ. मग शांत झाला की बोल..

वीरू: शांत.. या जन्मात नाही ..

गब्बर: वीस वरीस झालं जेलातून सुटून .. कां सोडलं ठाऊकाय? गांधीबाबाचा अभ्यास केला..

वीरू: तो तर तू आधीपण करायचा.. इकडून गांधी लुटायचा कधी तिकडून ..

गब्बर: तो गांधी अलग.. म्या पुस्तकं वाचली.. गांधीबाबाची परीक्षा दिली..नवा जल्म झाला माझा ..

नवा जल्म .. बावीस वरीस झालं.. बंदुकीला हात नाय.. एकदम जंटलमन..

वीरू: तशी मी पण शेतीच करतो.. गावचा मुखिया आहे लक्ष्मणपुरचा.. बसंतीचा टांगा भाड्याने चालवतो कुणी.. मी पण सोडले ते गुंडगिरीचे दिवस.. तुला पकडून दिले.. पन्नास हजार मिळाले .. त्यात संसार बसवला.. सगळे झाले पण माझा यार जय काही परत येत नाही .. त्याला मारणारा तू..

गब्बर: वीरू, दोन गोष्टी आइक.. मग ठरव.. मग नाय म्हनलास तर विकासला सांगेन .. सारं काही इसरून जा.. जुना गब्बर असतो तर पळवून नेली असती पोर.. पन या पोरांनी आपल्या जुन्याचं वझं का उचलावं.. तुझी राधावैनी .. जय गेला.. ती तर माझ्या मुळं जनू दुसरूंदा इधवा झाली.. पन गेल्या बावीस वर्सात एकतरी तक्रार करायला जागा दिली नाय.. मानूस बदलतं.. माझा हा नवा जल्म ..आन् अजून एक.. माझ्यासारखा मानूस तर आमदार व्हायला एकदम लायक.. जर एमेले म्हनून पोरगी मागितली असती तर नाय म्हनायची हिम्मत झाली असती? पन म्या राधेला शबद दिला .. म्या बदललो.. उगाच धाकदपटशा दाखवून

आमदार नाय व्हायचं.. जंटलमन म्हंजे एकदम खराखुरा जंटलमन .. आपल्या दुष्मनीच्या शोलेत पोरांचे हाल नको वीरू.. हवंतर आपन एकमेकांच्या घरला नको यायला.. जायला .. पन पोरांची ताटातूट नको.. राधा सगळं इसरायला तयार झाली.. म्या बी म्हणलं, जाव दे.. ठाकूरने खिळेवाल्या मोजड्या घातलेल्या.. अजून जपून ठेवल्या.. टाकल्या नाय.. जुन्या दिसांची आटवण.. नवा जल्म माझा .. तू पण ते समदं सोडून शेती करतो.. पोर तुझी लय गुणी हाय.. कशाला आपला हट्ट ..

वीरू: गब्बर .. तू म्हणतो ते पटत नाही .. पण माझ्याकडे जयचे कॉईन आहे.. जय गेला नि टाकून दिलेले.. परत शोधून आणलंय.. टॉस करतो.. हेड्स लग्नाला तयारी नाही .. टेल्स .. हे लग्न होणार..

पाठीमागून झाडाआडून विकास लपून सारे ऐकतोय .. तो गिरिजाला फोन करतो..

विकास: गिरी..

गिरिजा: बोल विका..

विकास: हे विका काय?

गिरिजा: मग तू पण मला गिरी म्हणू नकोस ..

विकास: बरं.. जा.. ऐक. मीटिंग सुरू आहे.. तुझ्या बाबांनी नाणे काढलंय एक.. म्हणतात टॉसवर ठरवू..

गिरिजा: ओह.. जयकाकाचं नाणे.. टेल्स म्हणजे काय म्हणाले बाबा?

विकास: टेल्स म्हणजे लग्न होणार ..

गिरिजा: दोन्ही साईडला टेल्स आहे विकास .. तुला म्हणाली होती एकदा ना ते स्पेशल कॉईन आहे हे..

विकास: म्हणजे ..

गिरिजा: म्हणजे निर्णय पक्का .. बघ तिकडे काय होतंय ..

गब्बर: एका नाणेफेकीवर पोरांचे भविष्य?

वीरू: जयचं खास नाणंय .. टॉस करतो..

वीरू नाणे उडवतो..

वीरू: टेल्स.. म्हणजे हे लग्न होणार .

गब्बर: थ्यांक्यू संबंधीजी..

वीरू: संबंधी? तू माझ्या गावात नि मी तुझ्या गावात पाय टाकायचा नाही .. आपल्या दुष्मनीचे शोले तसेच राहणार गब्बर .

गब्बर: अन् पोरांचे प्यारके शोले पण भडकणार.. आनंद हाय..

१४.

तीच गावाची सीमा..

लग्नमंडप.. विकास आणि गिरिजाचं लग्न लागतंय ..

गब्बर सीमारेषेच्या एका बाजूला .. वीरू आणि बसंती दुसऱ्या बाजूला उभे आहेत.. राधा इकडून तिकडे जातेय..

पाठून गाणे

प्रेमाच्या वर्षावात कुणी होते ओले..
कुणी ठेवी पेटवीत दुष्मनीचे शोले..

वाजवा रे वाजवा होतं..

गब्बर आणि वीरू लांबवरून अक्षता टाकतात.. समोर लग्नातल्या होमाच्या अग्नी ज्वाला प्रज्वलित होतात..

# रामायण लेटेस्ट व्हर्जन : एक एकांकिका

(पाठीमागे निवेदन)

काही गोष्टी कालातीत असतात पण तरी कालानुसार बदलतात. खरंतर बदल हा खरा स्थायीभावच समजला पाहिजे. सॉफ्टवेअरच्या व्हर्जनची व्हर्जन मागून व्हर्जन येत राहतात. तसे सर्वच बाबींचे असते. म्हणजे पुनर्जन्म हा या जन्माचे पुढचे व्हर्जन समजावे का?

तर मूळ मुद्याकडे वळू.

सीतेला रावणाने पळवले म्हणून सारे ‘रामायण‘ घडले. जर रावणाने सीतेला पळवलेच नसते तर?

***

(कैकयी महालाबाहेर घुमतेय. दशरथराजा आपल्या टेबलावर काहीतरी लिहीत बसलेला.)

कैकयी : मे आय कम इन महाराज?

दशरथ : येस, प्लिज..

कैकयी : महाराज एक इंपॉर्टंट काम होते, तुम्ही फ्री असाल तर..

दशरथ : यस राणी सरकार. बोला. तुमच्यासाठी आम्ही नेहमीच फ्री असतो.

कैकयी : ते दिवस आठवतात महाराज ? लढाईत आम्ही तुम्हाला वाचवले होते? आणि तुम्ही आम्हाला काही वचने दिली होतीत..

दशरथ : आठवताहेत महाराणीजी. आजच ऑर्डर देऊन टाकू. टाका मागवून साड्या नि दागिने. मला वाटते आता ऑन लाईन पण मिळतात, शत्रुघ्नाला सांगा त्याला ते प्रकरण नीट जमते.

कैकयी : नाही महाराज. ते तर आम्ही नेहमी मागवतोच. त्यासाठी वचने कशाला?

दशरथ : ओ.के. मागा काय हवे ते. आम्ही वचन पूर्ण करूच.

कैकयी : थँक्यू महाराज. आमची मागणी काही जास्त नाही तशी. लवकरच रामाचा राज्याभिषेक होतोय.

दशरथ : मग?

कैकयी : तेव्हा माझ्या पहिल्या प्रॉमिसनुसार तुम्ही रामाऐवजी माझ्या भरताला राजा बनवा.

(दशरथाचा चेहरा काळवंडतो. अशा जोरका धक्क्याची त्याची अपेक्षा नसते. आता दुसरे काय मागेल ही?)

कैकयी : ( दशरथाच्या प्रतिक्रियेची वाट न पाहता ) आता दुसरे वचन. रामाला तुम्ही चौदा वर्षे वनवासात पाठवा.

(दशरथाचा आधीच काळवंडलेला चेहरा काळाठिक्कर पडतो.)

दशरथ : चौदा वर्षे? ही असली कसली वचने मागता महाराणी कैकयी?

कैकयी : तुम्ही सम्राट, राजाधिराज. तुम्ही वचनाचे पक्के. त्यामुळे तुम्हाला ऑप्शन ही नाही दुसरा.

(थोडा वेळ शातंता. दशरथ अस्वस्थ. मग एकाएकी)

दशरथ : हे खरंय. ( टाळी वाजवून ) कोण आहे रे इकडे? (कोणीच येत नाही हे पाहून दुसरीकडे टाळी वाजवत) कोण आहे रे तिकडे?

सेवक : मी आहे महाराज.

दशरथ : इकडे कोणी नाही?

सेवक : ( करंगळी दाखवत ) गेलाय महाराज

दशरथ : आमच्या हेडक्लार्कला बोलवा लगेच.

सेवक : जो हुकूम महाराज

(दशरथ राजा डोक्यावर हात ठेऊन बसतो. मोबाईल चेक करतो. कपाळावरचा घाम पुसतो. इतक्यात क्लार्क धापा टाकत येतो.)

क्लार्क : आपने याद फर्माया म्हाराज ?

दशरथ : अरे तू सुब्बू?

क्लार्क : जी म्हाराज. अब्बी मेरेको ऑल इंड्या कोटेसे अपाॅइंटमेंट मिला है.

दशरथ : ठीक. दो ऑर्डर्स निकालो और हमारा सही लेके जाओ.

क्लार्क : सही? मैं समजा नही?

क्लार्क : सही रे सही. वो क्या बोलते? सिग्नेचर.

क्लार्क : अब्बी समजा म्हाराज. क्या ऑर्डर है महाराज?

दशरथ : हे पहा सुब्बू, ऑर्डर लवकर काढो. आणि या कानाचे त्या कानास समजू मत देना.

सुब्बू : नही समजा सार

दशरथ : अरे सुबू, भिंती के भी कान होते हैं.

(सुब्बू बावळटासारखा चेहरा करून उभा)

दशरथ : सुब्बू हे सिक्रेट काम है

सुब्बू : अब्बी समजा सार

(दशरथ ऑर्डर डिक्टेट करतो.)

दशरथ : पहिला ऑर्डर, भरताचा लवकरच राज्याभिषेक होयेगा आणि दुसरी.. रामचंद्रास चौदा वर्षे वनवासात जावे लगेंगा. नीटसे ड्राफ्ट करना सुब्बू. लवकर.

सुब्बू : समजा महाराज. पर वो भरत सार को क्यो वनवास महाराज?

दशरथ : तू काय बहिरा है रे सुब्बू. भरतका राज्याभिशेक और रामचंद्र का वनवास. अबी और प्रश्न नाही विचारनेका. जल्दी बोला वैसा करो. आणि सिक्रेट ठेवो

क्लार्क : ओके सार, अब्बी आया. गेटींगीट इमिज्येटली सार.

(सुब्बू जातो.)

दशरथ : (टाळी वाजवीत ) कोण आहे रे तिकडे? (कोणीच येत नाही हे पाहून दुसरीकडे टाळी वाजवत) कोण आहे रे इकडे?

सेवक आत येतो.

सेवक : काय हुकूम महाराज?

दशरथ : आता हा तिकडचा कोठे गेलाय?

सेवक : (करंगळी दाखवत) गेलाय महाराज

दशरथ : रामचंद्रांस बोलावणे धाडा, लवकर. सत्वर एकदम.

सेवक : जो हुकूम महाराज.

(रामचंद्र दशरथा समोर)

राम : आपण बोलावले मला तात?

दशरथ : होय रामचंद्रा. बसा जरा येथे.

राम : तात तुम्ही आठवण काढलीत? तरीच मला मॅगी खाता खाता उचकी लागली आणि मला वाटले जानकीने मसाला जास्त टाकला की काय?

दशरथ : मॅगी? हे कोणते नवीन पक्वान्न रामचंद्रा?

राम: पक्वान्न नव्हे तात, नूडल्स. म्हणजे शेवया. सीता पण ते छान बनवते. तेही दोन मिन्टांत. पण मला का बोलावलेत?

दशरथ : कसे सांगू रामचंद्रा, तेच कळत नाही.

राम : ड्याड, जे असेल ते सांगा, तुमची आज्ञा शिरसावंद्य तात.

दशरथ : तुमच्या कैकयी मातोश्री आहेत ना त्यांना आम्ही दोन वचने दिली होती.

राम : वचने पॉप? मग?

दशरथ : त्यानुसार तुम्हास रामचंद्रा, चौदा वर्षे वनवासात जावे लागेल.

राम : राज्याभिषेकानंतर ड्याड की आधीच?

दशरथ : नाही रामचंद्रा त्या आधी.

राम : ठीक आहे तात, मी तुमच्या आज्ञेबाहेर नाही. बनू देत लक्ष्मणास राजा..

दशरथ : नाही. रामचंद्रा, कैकयी मातेच्या दुसऱ्या वचनानुसार भरत राजा होईल, लक्ष्मण नव्हे.

राम: जशी आज्ञा महाराज.

दशरथ : रामचंद्रा, तू लगेच मानलेस सारे?

राम : होय तात. कोणत्याही युगात राम हा रामासारखाच राहिल ना तात?

दशरथ : होय रामा, आमची ही हीच अपेक्षा होती. (टाळी वाजवीत) कोण आहे रे इकडे? (कोणीच येत नाही. दुसरीकडे टाळी वाजवीत) कोण आहे रे तिकडे?

सेवक आत येतो

सेवक : काय हुकूम महाराज

दशरथ : हा इकडचा कोठे गेलाय?

सेवक : (करंगळी दाखवत ) गेलाय महाराज

दशरथ : रामचंद्रांसाठी फ्लाईट बुक करा. चार्टर्ड फ्लाईट. डायरेक्ट दंडकारण्यासाठी.

सेवक : जो हुकूम महाराज.

राम : आम्ही जानकीस खबर देऊन येतो महाराज.

राम आपल्या महालात. सीता बसून टीव्ही पाहतेय. राम आल्यावर रिमोटने म्यूट करते.

सीता : नाथ, असे अर्धवट खाणे टाकून गेलात आणि तुमचा चेहरा असा का काळवंडला नाथ? मॅगी नीट नाही की मसाला जास्त झालाय? उचकी लागली ती खाताना?

राम : सीते, नाही गं राणी, तू सुगरण आहेस, तुझ्या हातचे मॅगीच काय पण पाणी ही गोड वाटते मला पण..

सीता : पण काय नाथ?

राम : मला जावे लागेल

सीता : कोठे महाराज ?

राम : वनवासात, चौदा वर्षे..

सीता : वनवास? फ़ॉर्टीन इयर्स? आणि दरवेळी तुम्हीच का? तुम्ही ऐकून घेता म्हणून?

राम : पिताजींची आज्ञा. आम्ही पालन करणारच

सीता : ठीक. पण यावेळेस मी नाही येणार, तुम्ही जा हवे तर. मागच्या वेळीस सारे रामायण माझ्यामुळेच घडले असे म्हणतात ना. मी नाही यावेळेस येणार.. असे पण मला किती बोअर होईल तिथे आणि माझी ही टीव्ही सिरियल अगदी इंटरेस्टिंग टर्न वर आहे आता. तुम्हाला हवे तेवढे रेडी टू इट पॅकेट्स देते म्हणजे सारी सोय होईल.

राम : खरंय तुझे जानकी, मला ही मागच्या वेळी सारे लटांबर घेऊन जायचे टेन्शन होतेच.. यावेळी जरा रिलॅक्स होईन

सीता : आणि आता व्हिडीओ कॉलिंग पण आहे. व्हॉट्स्याप आहे.

राम : व्हेरी ट्रू सीते, व्हेरी व्हेरी ट्रू..

(इतक्यात बाहेर थाप येते )

लक्ष्मण : मी आहे रामा.

राम : येस ब्रो, कम इन.

लक्ष्मण : (रागाने ) हे मी काय ऐकतोय रामा? आणि तू ॲंग्री झालास?

राम : शांत लक्ष्मणा शांत. ॲंग्री होऊ नकोस मी ॲंग्री झालो म्हणून. मी बोलून चालून राम आहे.

लक्ष्मण  : (कपाळावर हात मारत) अरे रामा! हं, तेही  खरंच आहे रामा.

राम : लवकरच मी प्रस्थान करेन.

लक्ष्मण : रामा, तू गेलास की मला करमणार नाही इथे. मी मागच्या वेळी आलो होतो पण आता जा ॅब मधून सुट्टी मिळेल असे दिसत नाही. एनी वे आपण ऑनलाइन कॉंटॅक्ट मध्ये राहूच. तेव्हढा वेबक्याम घेऊन जा म्हणजे झाले. आणि ती आपली कुटी अजून असेल तिथे. तिथे नीट रेंज आहे ना ते पाहून घे.

राम : लक्ष्मण ब्रो, डोंण्ट वरी. ड्याडनी दिलेले वचन पाळावेच लागेल. भरत होईल राजा त्याला तू यावेळी मदत कर. मागच्या वेळी तो एकटा पडला होता अगदी.

लक्ष्मण : होय ब्रो.

(राम मग दशरथाचा निरोप घ्यायला जातो. दशरथ विमनस्क बसलेला.)

राम : ड्याड

(दशरथ वर पाहत नाही)

राम : ड्याड, डोण्ट बी सो स्याड. कैकयीअम्मा इज म्याड. पण मी तुमच्या सांगण्याबाहेर नाही.

दशरथ : (मोठ्या कष्टाने )बेटा ते आम्हाला ठाऊक आहे. कुठल्याही युगात राम रामासारखाच राहील. आम्ही तुमची फ्लाईटची अरेंजमेंट करून ठेवतो. (उजवी कडे वळून ) कोण आहे रे तिकडे? (कोणीच येत नाही पाहून) कोण आहे रे इकडे?

सेवक : मी आहे महाराज.

दशरथ : या बाजूचा सेवक कुठे आहे?

(सेवक करंगळी दाखवतो.)

दशरथ : तुम्ही काय दिवसभर आलटून पालटून हेच करता काय? फ्लाईटची तिकिटे बुक झालीत काय?

सेवक : होय महाराज. स्पेशल चार्टर्ड फ्लाईट आहे.

दशरथ : रामा तुमची सारी सोय होईल. फ्लाईटने जा. गेल्यावर मेसेज पाठवा.

राम : जी तात.

***

(रामाच्या वनवासाच्या प्रयाणाची वेळ. रामाच्या हातात व्ही आय पी ची सूटकेस. पाठीवर सॅक. हातात मोबाईल आणि लॅपटॉप. राम पुढे, मागे सीता, लक्ष्मण कौसल्या सुमित्रा, राजा दशरथ आणि बाकी सारे प्रजाजन. मागून हेलिकॉप्टरची घरघर. मग रामाचे वनवासासाठी प्रयाण. हेलिकॉप्टरमध्ये चढता चढता मागे फिरतो. )

लक्ष्मण : व्हॉट्स द मॅटर ब्रो?

राम : काही नाही. माझे रिबॉक शूज आहेत घरी. मागे भरत माझ्या खडावा घ्यायला जंगलात आला बिचारा. यावेळी माझे शूज घेऊ देत त्याला.

लक्ष्मण : होय भय्या. मी भरताला सांगतो.

(राम मग त्याच्या आयांना नमस्कार करतो. दशरथास वाकून नमस्कार करतो. सीता भरल्या डोळ्यांनी निरोप घेते.

हेलीकॉप्टरची उडण्याची घरघर पाठून ऐकू येते. . त्याच्या पंखांच्या घरघरीत कोण काय बोलते ते ऐकू येत नाही. ते लांब जाई पर्यंत सारे हात हलवत राहतात. सीतेला रडू कोसळते ती कौसल्येच्या कुशीत शिरते. कौसल्या तिला समजावते. )

कौसल्या : रडू नकोस बाळे,

सुमित्रा : अगं मागच्या वेळेपेक्षा आता बरे ना ग. आता काय मोबाईल आहे, नेट आहे, व्हिडीओ कॉलिंग आहे. हवे तेव्हा बोलू शकता. तुम्ही लोक मागच्या वेळी गेलात तेव्हा आम्हाला या सोयी नव्हत्या.

कौसल्या : खरंय ग सीते, ही सुमित्रा म्हणते ते खरंय अगदी.

सीता : होय कौसल्या मम्मी खरंय. मी आता नाही रडणार. चला लवकर , आपण मिळून ‘बेटा धन का पेटा पाहू‘

कौसल्या : चल बेटा. सुमित्रे तू पण चल.

***

(दंडकारण्यातील झोपडी. राम आपले सामान उतरवून ठेवतो. प्रथम आपला लॅपटॉप काढतो आणि ऑन करतो. मग तो ऑन होईपर्यंत मोबाईल कडे पाहतो. हळूच स्वत:शीच बोलल्या सारख्या आवाजात)

राम : ओह गुड. रेंज आहे इथे.

(फोन लावतो)

राम : जानकी ! पोहोचलो गं.

-जरा तो टीव्हीचा आवाज कमी कर, ऐकू येत नाही

-हो.लवकर. यावेळी हेलिकॉप्टरने

-नाही ठीक आहे झोपडी. तशीच आहे.

-हो. बाई पडदे धुवून घेईन

-नाहीतरी तू नाहीस इथे, पडदे काढूनच टाकतो. तू नाहीस तर पडदे कशाला?

-मी? कुठे कोणामागे जाणार?

-मी आणि शूर्पणखेच्या?

-छे, तूच आहे माझी एकुलती एक. बायको

-मी मारिचाच्या मागे गेलो होतो?

-तू नाही नाही म्हणत होतीस तरी?

-बरं बाई तू खरी. मीच स्वत:हून गेलो होतो मारिचाच्या मागे. तू खरी

-तू नाहीस तर कंटाळा येईल, मिस यू

-आईंची काळजी घे आणि स्वत:ची पण

-लक्ष्मणाला फोन करायला सांग

-रोमिंग आहे इथे. इन्कमिंगला पैसे लागतात.

-उद्या व्हिडिओ कॉल ट्राय करतो

-बाय. ड्याड ना फोन करतो आता.

(परत फोन लावतो)

राम : तात, पोहोचलो इथे.

-नाही. नाही काही प्रॉब्लेम नाही

-तुम्ही वाईट वाटून घेऊ नका.

-सारे ठीक होईल, भरत आहे ना

-हां लक्ष्मण पण आहे यावेळी

-डोण्ट वरी ड्याड. ऍम फाईन

(मग त्याच्या फोनची रिंग वाजते)

राम : हाय लक्ष्मण !

-आहे ना रे रेंज चांगली.

-आहे वीज पण..,

-मधून मधून जरा रिचार्ज करत जा माझा फोन, इथे काहीच नाही आजूबाजूला..

-भरताला सांग नीट रहा. रागावू नकोस कैकयी आईवर..

-ड्याडना संभाळ.

-मागच्या वेळेस काय धमाल ना..

-चौदा वर्ष काय अशीच जातील रे लॅकी.

-शूर्पणखा? काय माहित?

-यावेळी टेन्शन नाही पण, जानकी तिथे सेफ आहे..

-चल नंतर बोलतो, बॅटरी डाऊन वाटते.

राम : (स्वत:शीच)कैकयी आईला फोन ? नुसता मेसेज पाठवतो.

(स्वत:शीच बोलत मेसेज टाईप करतो)

'कैकयी आई, नियतीस हेच मंजूर आहे असे दिसते. थ्यांक्यू व्हेरी मच'

( निवेदन : रामाचा वनवास सुरू होतो. कधी सीतेशी गप्पा कधी लक्ष्मणाशी तर कधी भरताशी. भरताला कधी राजनैतिक सल्ले तर लक्ष्मणाशी ही सल्ला मसलत. रात्री सीतेशी प्रेमाच्या गप्पा. दिवस सरत आहेत. राम कधी रेडी टू इट पाकिटे उघडून खातोय कधी शिकारी ला जातोय, कधी व्हीडीओ प्लेअर वर सिनेमा पाहतोय, कधी मोबाईल वर गेम खेळतोय. जंगलाचा फेरफटका आहेच. )(राम आपल्या लॅपटॉप वर बसून लिहितोय.)

राम : अरे ! फेसबुकवर ही कोणाची रिक्वेस्ट? लंकाधिपती रावण ! हं. रावणाला तर मी कधीच माफ केलेय. (लिहितो)

थ्यांक्यू. नाइस टू कनेक्ट आफ्टर सो लॉग. थ्यांक्स टू एफ. बी.

(राम रावणाला फोन लावतो)

-काय ओळखलंत की नाही?

-नाही यावेळी एकटाच.

-तिथेच, मागच्या वेळी होतो तिथे.

-हां, सीतेला पळवले होतेस तिथूनच..

-नाही लंकाधिपती, मी तुम्हाला कधीच माफ केलंय..

-भेटू एकदा, या इकडे. जागा माहितीच आहे तुम्हाला..

-छान ! वाट पाहातोय..

-काय करणार? एकटाच आहे. सिनेमे पाहतो नाहीतर हे चॅटिंग वगैरे..

-मागच्या वेळी चांगलीच धांदल उडाली होती.

-कितींदा सॉरी म्हणणार? विसरून जाऊ सारे..

-कधी येताय?

-ओ के. बाय..

(निवेदन : काही दिवसात रावणाची जंगलात रामाच्या झोपडीस भेट. राम रावणाचे सख्य जमते. दोघांच्या गप्पा होतात. दिवस सरतात. चौदा वर्ष होतात. राम परत अयोध्येत.)

***

राम : जानकी, मी आलोय परत

(सीता प्रथम टीव्ही म्यूट करते. नंतर टीव्ही बंदच करून टाकते.)

सीता : (डॊळ्यातील पाणी पुसत) नाथ आपण आलात. मी वाट पाहून थकले. किती वाट पाहिली मी तुमची

राम : चौदा वर्षे जानकी. १४ गुणिले ३६५ दिवस

सीता : हा हिशेब खूप कठीण आहे नाथ. पण कसे राहिले असाल वनवासात एवढी वर्षे? माझा एकही दिवस गेला नसेल तुमच्या आठवणी शिवाय. दर सिरीयल पाहताना दररोज तुमची आठवण यायची.

राम : आता मी आलोय ना इथे, बरं मी गेलो तेव्हा चालू असलेली तुझी सिरियल संपली की नाही?

सीता : नाही अजून. आता त्यांची पंधरावी पिढी दाखवतायत. त्यात तेराव्या पिढीतली आजी अजून बेशुद्ध होती. ती आज शुद्धीवर येईल म्हणतात. असे कॉम्प्लिकेट करतात की एक ही एपिसोड मिस झाला तर लिंक जाते.

राम : अगं सीते, आता मी आलोय ना.

सीता : बरं, ती शूर्पणखा भेटली की नाही?

राम : भेटली ना.

सीता : काय? कुठे?

राम : अगं व्हॉट्स्यापवर आहे ती.

सीता : तुम्हाला काय माहिती? आणि मारिच आला का?

राम : मारिच नाही. स्वत: लंकाधिपती रावणाची भेट झाली माझी..

सीता : काय सांगताय काय? कुठे?

राम : कुठे म्हणजे? दंडकारण्यातच. मी फोटो नव्हते पाठवले रावण भेटीचे?

सीता : फोटो आले होते. पण लक्ष्मण भावजी म्हणाले बहुधा फोटो शॉप केले असणार म्हणून.

राम : छे गं, अगदी ओरिजिनल, मी आणि रावण आता फेसबुक फ्रेंडस आहोत.

सीता : काही ही सांगता तुम्ही नाथ. आय डोण्ट बिलिव्ह. बरे आता काही खाऊन घ्या. भुकेले असाल अगदी.

राम : हो, तुझ्या हातचे खाऊन किती वर्षे झाली..

सीता : चौदा, १४ गुणिले ३६५ दिवस

राम : काय बनवतेस?

सीता : इन्स्टंट पास्ता.

राम : पास्ता? हे कुठले नवीन पक्वान्न जानकी?

सीता : पक्वान्न नाही नाथ. पण छान आहे, बनतेही फटाफट

राम : काही असो, तू आहेसच इंस्टंट सुगरण माझी. तू बनव तोवर मी भरत आणि लक्ष्मण ना भेटून येतो.

(मग राम भरत भेट)

भरत : श्रीरामा, तुम्ही परत आलात, ही गादी सांभाळा. हे रिबॉक शूज सांभाळून मी दमून गेलोय नुसता

राम : नाही, भरता नाही. हे राज्य तूच चालव. आता सिंहासनावर बसून चालव. कारण हे शूज मला हवेत आता जॉगिंगसाठी. आणि तुला प्रशासनाची नॅक चांगली आहे म्हणतात.

भरत : पण हे सिंहासन माझे नाहीच.

राम : असे बोलू नकोस भरता, यापुढे तूच राज्य चालव. मी राहीन तुझा चीफ पॉलिटिकल ॲडवाझर नि लक्ष्मण आहेच आपल्या बरोबर.

भरत : जशी तुमची आज्ञा रामचंद्रा

राम : आणि लक्ष्मणा, रावण इज माय फेसबुक फ्रेंड नाऊ..

लक्ष्मण : काय सांगतोस?

राम : एवढेच नाही तर लंकाधिपती स्वत: येऊन गेले. यावेळी सारे कसे शांत शांत..

लक्ष्मण : इथे पण सारे ठीक रामा.

राम : बरे भरत, एक महत्वाचा निर्णय घ्यायचाय लवकर.

भरत : बोला,जशी आज्ञा..

राम: मला वाटते आपण लंकेशी संबंध सुधारावेत. तू आणि लक्ष्मण दोघे लंकेस स्वत: जा.

लक्ष्मण : अगदी लंका अयोध्या भाई भाई?

राम : येस. भाई भाई.

(हनुमान आत येतो)

हनुमान : जय श्रीराम ! मला आज्ञा द्यावी

राम : कसली?आणि आज खूप दिवसानी? हनुमाना, आहेस कुठे?

हनुमान : माझी शेपटी वळवळतेय, मागच्या वेळी लंका जाळली होती. काहीच नाहीतर पर्वत उचलून आणला होता. आता मला काय काम नाही. यावेळी लंका अयोध्या भाई भाई?

राम : हनुमंता, तुला हवेय तरी काय?

हनुमान : व्ही आर एस . ज्यात काही मारायण नाही त्या रामायणात माझे काय काम?

लक्ष्मण : हनुमंता, तुझा ॲप्लिकेशन पाठव, विचार करून कार्यवाही होईल..

भरत : खरंय लक्ष्मणा. सारे प्रोसिजरने होऊ देत.

हनुमान : जय श्रीराम!


राम : हनुमंता, जा चिरंजीव हनुमान, जा करा आराम.

***

( निवेदन: असे हे रामायण. लेटेस्ट व्हर्जन. यात लढाई नाही, हिंसा नाही, सीतेची अग्निपरिक्षा नाही. सारे कसे छान सुरळीत आणि शांत. शेवटी काय सुधारित लेटेस्ट व्हर्जन आहे हे, रामायण व्हर्जन २०२०)


डॉ. नितीन मोरे यांची प्रकाशित पुस्तके


यांच्या कव्हरवर क्लिक करताच (नेट असल्यास) पुस्तक उघडेल.































डॉ. नितीन मोरे
न.वा.च्या(प्रेम)कविता








डॉ. नितीन मोरे
वाळूतील
रेघा

राग दरबारी
डॉ. नितीन मोरे

डॉ. नितीन मोरे
अहम्
ब्रह्मास्मि

डॉ. नितीन मोरे
नाच जमूरे नाच

डॉ. नितीन मोरे
आधुनिक कहाण्या

डॉ. नितीन मोरे
प्रिय पत्रास,

डॉ. नितीन मोरे
भ्र
शिष्टाचार

डॉ. नितीन मोरे
संधी साधू

डॉ. नितीन मोरे
या
कोल्हटकरांच्या
घरात

डॉ. नितीन मोरे
मच्छर टाईम्स

डॉ. नितीन मोरे
एकपात्री नाट्यछटा
सांगतो
ऐका

डॉ. नितीन मोरे
केल्याने

डॉ. नितीन मोरे
संवादांनी
प्रकटावे

डॉ. नितीन मोरे
अ..अ..म..
अवलोकन.अनुभव.मनोव्यापार

डॉ. नितीन मोरे
काही (च्या काही) कविता

## ई साहित्य प्रतिष्ठानचे हे तेरावे वर्ष.

## डॉ. नितीन मोरे यांचे हे सत्ताविसावे पुस्तक.

डॉ. नितीन मोरे एक यशस्वी specialist डॉक्टर आहेत आणि एक उत्साही लेखकही. त्यांच्या लेखनात एक ताजेपण असते. त्यांचा विनोद कोणाच्या व्यंगावर आधारित नसतो, तर समाजातील अनिष्ट विसंगतीवर ते आपल्या विनोदातून नेमकं बोट ठेवतात. समझदार वाचकांना त्यांचा इशारा काफ़ी असतो. त्यामुळे त्यांच्या नर्म विनोदाचा एक फ़ॅनवर्ग निर्माण झाला आहे. ते फ़क्त विनोदी साहित्य नव्हे तर निरनिराळ्या प्रकारचे लेखन लिहीतात. त्यांनी गेली अनेक वर्षे आपले लेखन निरंतर चालू ठेवले आहे. त्यांना प्रकाशक मिळायला तोटा नाही. पण त्यांना आपली पुस्तके जास्तीत जास्त लोकांपर्यंत नेणारे आणि प्रकाशनप्रक्रिया सुलभ असणारे प्रकाशन हवे होते. त्यांनी ई साहित्यची निवड केली.

डॉ. नितीन मोरे यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपली पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. शंभू गणपुले (नऊ पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर (९ पुस्तके), डॉ. वसंत बागुल (१७ पुस्तके), शुभांगी पासेबंद (९ पुस्तके), अविनाश नगरकर ( चार पुस्तके), डॉ. स्मिता दामले (सात

पुस्तके), डॉ. नितीन मोरे (२७ पुस्तके), अनील वाकणकर (९), अनंत पावसकर(४ पुस्तके), मधू शिरगांवकर (७), अशोक कोठारे (बारा हजार पानांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १६ पुस्तके), विनीता देशपांडे (७) उल्हास हरी जोशी(७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (८), डॉ. वृषाली जोशी(१६), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी(६), डॉ. नंदिनी धारगळकर (८), अंकुश शिंगाडे(५), आनंद देशपांडे(३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके(२) स्वाती पाचपांडे(२) असे अनेक ज्येष्ठ, अनुभवी लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत पोहोचवतात. एकही पैशाची अपेक्षा न ठेवता.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपले नाव नेऊन ठेवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये। विशेषीं लोकीं 'इ'यें।

दृष्टादृष्ट विजयें। होआवे जी।